मराठी

# आंतरभारती

इयत्ता नववी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.


(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

# मैत्री तंत्रज्ञानाशी



मुलांनो, तुम्ही दररोज मोबाईल व संगणक हाताळत आहात. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात विविध सोईसुविधा आपल्याला या माध्यमांद्वारे पुरवल्या जातात.

या सुविधा म्हणजेच वेगवेगळ्या प्रकारची सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन्स असतात. त्याला तुम्ही ॲप्स असेही म्हणता.




तुम्हांला येथे काही ॲप्सची सांकेतिक चिन्हे दिलेली आहेत. या चिन्हांना काय म्हणतात, ही ॲप्स कशासाठी वापरली जातात, याची माहिती घरातील मोठ्या व्यक्तींकडून जाणून घ्या व लिहा.

**• *विचार करा. सांगा.***

- तुम्हांला मोबाईल/संगणकावरील कोणती ॲप्स वापरायला आवडतात?
- अभ्यास करण्यासाठी अशा एखाद्या ॲप्सचा वापर करणे तुम्हांला आवडते का? सकारण सांगा.
- या विविध ॲप्सचा उपयोग तुम्हांला आवश्यक वाटतो का? असल्यास/नसल्यास का ते सांगा.
- मोबाईल/संगणकावरील ॲप्स वापरताना तुम्ही कोणती दक्षता घ्याल ?

- तुम्हांला अभ्यास करताना कोणकोणत्या गोष्टी कठीण वाटतात? त्यासाठी कोणती ॲप्स तयार व्हावीत असे तुम्हांला वाटते?

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३.३.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## मराठी

# आंतरभारती

## इयत्ता नववी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.

FYDHDC

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१७
चौथे पुनर्मुद्रण : २०२१

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती :**

श्री. नामदेव चं. कांबळे (अध्यक्ष)
फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
डॉ. रोहिणी गायकवाड (सदस्य)
श्रीमती माधुरी जोशी (सदस्य)
श्री. अमर हबीब (सदस्य)
श्रीमती अर्चना नरसापूर (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य-सचिव)

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

श्री. समाधान शिकेतोड
श्री. बापू शिरसाठ
श्रीमती प्रांजली जोशी
श्रीमती वैदेही तारे
श्री. मयुर लहाने
प्रा. विजय राठोड
डॉ. माधव बसवंते
श्री. देविदास तारू
श्री. संदीप रोकडे
श्रीमती स्मिता गालफाडे
डॉ. प्रमोद गारोडे
श्री. प्रमोद डोंबे
श्री. शिवा कांबळे
डॉ. सुभाष राठोड
श्री. मोहन शिरसाट
श्री. नाना लहाने
डॉ. शारदा निवाते
श्रीमती अनुजा चव्हाण
श्री. प्रवीण खैरे
श्रीमती प्रतिभा लोखंडे
डॉ. मंजूषा सावरकर
श्रीमती जयमाला मुळीक
श्रीमती स्वाती ताडफळे
डॉ. नंदा भोर
डॉ. कमलादेवी आवटे
श्री. हेमंत गव्हाणे

**प्रकाशक**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५.

**निमंत्रित तज्ज्ञ**
श्री. शिवाजी तांबे
डॉ. सुजाता महाजन

**संयोजन** : श्रीमती सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी
**चित्रकार** : फारुख नदाफ, यशवंत देशमुख
**मुखपृष्ठ** : फारुख नदाफ
**अक्षरजुळणी** : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.
**निर्मिती** : सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
राजेंद्र चिंदरकर, निर्मिती अधिकारी
राजेंद्र पांडलोसकर, सहायक निर्मिती अधिकारी
**कागद** : ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह
**मुद्रणादेश** :
**मुद्रक** :

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा

व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थ्यांनो,

तुम्हां सर्वांचे इयत्ता नववीच्या वर्गात स्वागत आहे. 'आंतरभारती' मराठी इयत्ता नववीचे हे पाठ्यपुस्तक तुमच्या हातात देताना अतिशय आनंद होत आहे.

मित्रांनो, आपण एकमेकांशी संवाद साधण्यासाठी मराठी भाषेचा वापर करतो. मराठी ही आपल्या राज्याची राजभाषा आहे. ती आपल्याला उत्तम प्रकारे वापरता आली पाहिजे. आपले विचार, कल्पना, भावभावना समोरील व्यक्तीसमोर योग्यप्रकारे आणि प्रभावीपणे मांडायच्या असतील तर भाषेवर प्रभुत्व हवे. या पुस्तकाचा अभ्यास केल्यामुळे तुमचे भाषेवरील प्रभुत्व वाढावे, भाषेचा विविध प्रकारे वापर करणे तुम्हांला सहज जमावे असे आम्हांला वाटते.

या पाठ्यपुस्तकातून विविध साहित्यप्रकारांची ओळख तुम्हांला करून दिली आहे, ते वाचून तुम्हांला मराठी भाषेचे शब्दवैभव विविधांगी आहे, हे लक्षात येईल. भाषा हे नवनिर्मितीचे साधन आहे. तुम्हांला नवनिर्मितीचा आनंद मिळावा, म्हणून या पुस्तकात अनेक भाषिक कृती दिल्या आहेत.

पाठ्यपुस्तकात तुमच्या विचारशक्ती, कल्पनाशक्ती व सृजनशीलतेला संधी देण्यासाठी अनेक कृती दिल्या आहेत, त्या कृती तुम्ही जरूर करा. भाषाभ्यासाच्या कृतींतून भाषेचे घटक, त्यांचे उपयोग समजावून घ्या. त्याचबरोबर लेखनक्षमता व अभिव्यक्ती विकास यांसाठी विविध कृती व नमुने दिले आहेत, त्यांचा तुम्ही अभ्यास करा. या कृतींतून तुमच्यातील लेखनकौशल्य व वाङ्‌मयीन अभिरुची नक्कीच वाढणार आहे. दैनंदिन व्यवहारामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरही तुम्हांला करायचा आहे व त्याचे फायदेही समजून घ्यायचे आहेत. पाठ्यघटकाशी संबंधित पूरक माहितीसाठी पाठ्यपुस्तकामध्ये दिलेल्या संदर्भग्रंथ सूचीचा व संकेतस्थळांचाही अभ्यासासाठी वापर करा.

या पाठ्यपुस्तकाबाबतचे तुमचे मत आम्हांला नक्की कळवा.

तुम्हां सर्वांना शुभेच्छा !

**(डॉ. सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २८ एप्रिल, २०१७, अक्षय्यतृतीया
भारतीय सौर : ८ वैशाख १९३९

# भाषाविषयक क्षमता : संयुक्त भाषा मराठी

**इयत्ता नववीच्या अखेरीस विद्यार्थ्यांमध्ये भाषाविषयक पुढील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.**

| क्षेत्र | क्षमता |
|---|---|
| श्रवण | १. विविध प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या चर्चा, संवाद ऐकणे व त्यांतील मुख्य विचार समजून घेण्याचा प्रयत्न करणे.<br>२. सार्वजनिक ठिकाणांवरील ऐकलेल्या सूचनांनुसार योग्य कृती करणे.<br>३. औपचारिक व अनौपचारिक संवाद व संभाषण ऐकून त्यांतील मुख्य विचार समजून घेणे.<br>४. विविध प्रकारचे साहित्य ऐकून त्याचा आस्वाद घेता येणे.<br>५. विविध साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती ऐकून त्यांचे प्रकारांनुसार वर्गीकरण करता येणे. |
| भाषण संभाषण | १. गाणी, कविता, समूहगीते तालबद्ध रितीने म्हणता येणे.<br>२. विविध साहित्यप्रकारांचे सादरीकरण करता येणे.<br>३. स्वत:चे विचार सुस्पष्टपणे मांडता येणे.<br>४. विविध उपक्रमांच्या नियोजनाच्या चर्चेत सहभाग घेता येणे.<br>५. भाषण संभाषणाच्या कौशल्यांचा उपयोग करता येणे.<br>६. विविध साहित्यप्रकारांच्या माध्यमांतून आपले विचार व्यक्त करण्याचा प्रयत्न करणे. |
| वाचन | १. पाठ्यपुस्तक व पाठ्येतर साहित्याचे समजपूर्वक व अर्थ लक्षात घेऊन प्रकटवाचन करता येणे.<br>२. विरामचिन्हांची दखल घेऊन अर्थपूर्ण प्रकटवाचन करता येणे.<br>३. दिलेल्या उताऱ्याच्या आशयाची मध्यवर्ती कल्पना, सारांश, विचार समजून घेऊन लेखन करता येणे.<br>४. विविध साहित्याचे समजपूर्वक वाचन करून त्याचा आस्वाद घेता येणे.<br>५. आंतरजालावर उपलब्ध असलेल्या संकेतस्थळावरील माहितीचे वाचन करता येणे.<br>६. सार्वजनिक ठिकाणच्या सूचना समजपूर्वक वाचून त्याबाबत स्वमत तयार करता येणे. |
| लेखन | १. श्रुतलेखन करताना शुद्धलेखनाच्या नियमांचे पालन करता येणे.<br>२. ऐकलेल्या, वाचलेल्या साहित्याच्या आशयावरील प्रमुख मुद्दे लिहिता येणे.<br>३. दिलेल्या विषयामध्ये स्वत:च्या विचारांची भर घालून पुनर्लेखन करता येणे.<br>४. म्हणी, वाक्प्रचार, शब्द व शब्दसमूह यांचा उपयोग करून परिच्छेद लिहिता येणे.<br>५. दिलेल्या विषयावर मुद्द्यांच्या आधारे स्वतंत्र लेखन करता येणे.<br>६. घटना, प्रसंग यांवर आधारित सुसंगत विचार करून त्याबाबत लेखन करता येणे.<br>७. घडलेले प्रसंग, कार्यक्रम, घटना यांचे वृत्तान्त लेखन करता येणे.<br>८. पाठ्यपुस्तकात समाविष्ट केलेल्या उपयोजित लेखनातील घटकांवर लेखन करता येणे. |

**अध्ययन कौशल्य**

१. संदर्भासाठी शब्दकोश पाहता येणे.
२. मराठी भाषेतील म्हणी, वाक्प्रचार यांची यादी करता येणे.
३. ऑनलाइन अर्ज भरणे, बिले भरणे यांसारख्या सुविधांचा वापर करता येणे.
४. सोशल मिडियाच्या योग्य व जबाबदार वापराबाबत जाणीव जागृती होणे.
५. संगणकावरील साहित्याचा वापर करताना संबंधितांच्या हक्कांचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घेणे.
६. प्रसारमाध्यमे/संगणक इत्यादींवरून उपलब्ध होणाऱ्या कलाकृतींचा आस्वाद घेता येणे, चिकित्सक विचार करता येणे.
७. संगणक/इंटरनेटच्या साहाय्याने भाषांतर/लिप्यंतरण करता येणे.
८. विविध साहित्यप्रकारांचे त्यांच्या वैशिष्ट्यांनुसार वर्गीकरण करता येणे.
९. मराठी भाषेतील विविध साहित्यप्रकारांबाबत माहिती सांगता येणे.
१०. विविध सामाजिक समस्यांबाबत होणाऱ्या चर्चेमध्ये सहभागी होऊन आपले विचार मांडता येणे.

**भाषाभ्यास**

१. वाक्यांतील सामान्यरूप ओळखता येणे.
२. अव्ययीभाव समास व द्‌वंद्‌व समास ओळखता येणे व त्यांचा लेखनात उपयोग करता येणे.
३. अनुप्रास व यमक अलंकार ओळखता येणे व त्यांचा लेखनात उपयोग करता येणे.
४. शुद्‌धलेखनाच्या नियमांचा लेखनामध्ये उपयोग करता येणे.

## शिक्षकांसाठी

मराठी आंतरभारती इयत्ता नववी हे पाठ्यपुस्तक अध्यापनासाठी आपणांस देताना अतिशय आनंद होत आहे. विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्ये अधिकाधिक विकसित होण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या भावविश्वातील पाठ, कविता, गीते, कृती, स्वाध्याय यांसारख्या अनेक घटकांचा समावेश केलेला आहे. तसेच व्याकरण घटकांची मनोरंजक, सोप्या व कार्यात्मक पद्‌धतीने मांडणी केली आहे. उपयोजित लेखन या विभागामध्ये विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्य विकासासाठी विविध कृती व त्यांचे नमुने दिलेले आहेत. या वैविध्यपूर्ण कृतींतून विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्यांचा विकास होणार आहे. त्याचबरोबर त्यांच्यातील निरीक्षणक्षमता, विचारक्षमता व कृतिशीलता यांसही संधी मिळणार आहे.

शिक्षकांनी स्वत:च्या सृजनशीलतेने, कल्पकतेने विविध भाषिक कृतींची रचना करावी; त्याचबरोबर या विविध कृती तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांनाही प्रेरित करावे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विविध माध्यमांचा वापर करून अध्यापनात अधिकाधिक संदर्भ देणे अपेक्षित आहे. पाठ्यपुस्तकातील गद्य व पद्य पाठांमधील कठीण शब्दांचा अर्थ लक्षात घेण्यासाठी शब्दकोशाचा वापर करावा व त्यासाठी विद्यार्थ्यांनाही प्रेरणा द्यावी.

मराठी आंतरभारती इयत्ता नववी हे पाठ्यपुस्तक तुम्हांला आवडेल, अशी आशा आहे.

# अनुक्रमणिका

## भाग – १


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | भारतमाता (गीत) – शांता शेळके | १ |
| २. | संतवाणी– | |
| | (अ) बहु हा दयाळु– संत चोखामेळा | २ |
| | (आ) अनाथांचा नाथ– संत निर्मळा | ४ |
| ३. | पाळण्यातले पाय – राजा मंगळवेढेकर | ६ |
| ४. | दादू – वि. स. खांडेकर | १० |
| ५. | अजिंठ्याची सहल – पं. महादेवशास्त्री जोशी | १५ |
| ६. | बिनभिंतीची शाळा (कविता) – ग. दि. माडगूळकर | १८ |
| ७. | रंगलेला सामना – लीलाधर हेगडे | २१ |


## भाग –२


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| ८. | दिवे होऊया (कविता) – जयंतकुमार त्रिभुवन | २४ |
| ९. | संत कबीर | २७ |
| १०. | जडण–घडण – किशोरी आमोणकर | ३० |
| ११. | लेझीम (कविता) – श्री. बा. रानडे | ३४ |
| १२. | अबूखाँची बकरी – डॉ. झाकीर हुसेन | ३६ |
| १३. | शांतीगीत (कविता) – हाशम पटेल | ३९ |
| १४. | दिव्य – जयंत नारळीकर | ४१ |
| ❁ | उपयोजित लेखन | ४५ |

# १. भारतमाता

भाग – १

**शांता शेळके** (१९२२-२००२) : कवयित्री, गीतकार, कथालेखिका. 'मुक्ता', 'गुलमोहर', 'प्रेमिक', 'काचकमळ', 'सवाष्ण', 'अनुबंध' इत्यादी कथासंग्रह; 'विझती ज्योत', 'पुनर्जन्म', 'धर्म', 'ओढ' इत्यादी कादंबऱ्या; 'धूळपाटी' हे आत्मचरित्रात्मक लेखांचे संकलन; 'रुपसी', 'गोंदण', 'अनोळख', 'जन्मजान्हवी', 'पूर्वसंध्या', 'इत्यर्थ', 'किनारे मनाचे' हे कवितासंग्रह प्रसिद्ध.

प्रियतम असणाऱ्या भारतमातेविषयीचे प्रेम, निसर्गसौंदर्य, विविधतेतील एकता, उत्कट देशाभिमान यांचे वर्णन प्रस्तुत गीतातून कवयित्रीने केले आहे.

प्रियतम अमुची भारतमाता
आम्ही सारी तिची मुले
रंग वेगळे, गंध वेगळे
तरी येथली सर्व फुले!

प्रिय आम्हांला येथिल माती
प्रिय हे पाणी झुळझुळते
प्रियकर ही डुलणारी शेते
प्रिय हे वारे सळसळते.



प्रियतम अमुचा धवल हिमाचल
बघे भिडाया जो गगना
प्रियतम अमुचे सह्यविंध्य हे
प्रियतम या गंगा-यमुना.

मानव सारे समान असती
शिकवण ही जगतास दिली!
या मातेची मुले सद्गुणी
सर्व जगाला प्रिय झाली!

प्रियतम अमुची भारतमाता
वंदन आम्ही तिला करू
या मातेची मुले लाडकी
सदा तिचा ध्वज उंच धरू!

प्रस्तुत गीत हे काव्यानंदासाठी घेतले असून, ते विद्यार्थ्यांकडून तालासुरात म्हणवून घ्यावे.

FVMSEZ

# २. संतवाणी

## (अ) बहु हा दयाळु

**संत चोखामेळा :** संत चोखामेळा यांचा जन्मशक उपलब्ध नाही. इ. स. १३३८ हा त्यांचा समाधिशक सांगितला जातो. संत चोखामेळा यांच्या अभंगांतून भक्ताच्या हृदयातील कारुण्य जसे प्रकट होते, तशी सामाजिक विषमता, उपेक्षा याबद्‌दलची खंतही व्यक्त होताना दिसते. भागवत धर्माचे सार त्यांच्या व्यक्तित्वात, त्यांच्या कृती-उक्तीत अनुभवायला मिळते.

प्रस्तुत अभंगातून संत चोखामेळा यांनी परमेश्वराच्या कनवाळू रूपाचे वर्णन केले आहे.

बहुत कनवाळु बहु हा दयाळु ।
जाणे लळा पाळू भाविकाचा ।।१।।

जात वित्त गोत न पाहेचि कांहीं ।
घालावी ही पायीं मिठी उगी ।।2।।

न मागतां आभारी आपेंआप होतो ।
भाविकासी देतो भुक्तिमुक्ती ।।3।।

चोखा म्हणे ऐसा लाघवी श्रीहरी ।
भवभय वारी दरुशनें ।।४।।

सकलसंतगाथा खंड पहिला : संत चोखामेळा-अभंग,
अभंग क्रमांक ३८
संपादक : प्रा. डॉ. र. रा. गोसावी.

## स्वाध्याय

**प्र.१. आकृतिबंध पूर्ण करा.**

संत चोखामेळा यांनी परमेश्वरासाठी वापरलेली विशेषणे.

**प्र.२. चौकटी पूर्ण करा.**

(अ) परमेश्वर जाणतो –

(आ) परमेश्वर पाहत नाही –

(इ) भक्त परमेश्वराच्या पायावर घालतात –

(ई) परमेश्वर भाविकांना देतो –

**प्र.३. परिणाम लिहा.**

| घटना | परिणाम |
|---|---|
| (१) देवाचे दर्शन घेणे.<br>(२) भक्ताचे भक्ती करणे. | |

**प्र.४. स्वमत.**

(१) परमेश्वर भेदभाव करत नाही हा विचार अभंगाच्या आधारे पटवून द्या.

(२) परमेश्वराबद्‌दलचा संत चोखामेळा यांचा उत्कट भक्तिभाव तुमच्या शब्दांत लिहा.

## (आ) अनाथांचा नाथ

**संत निर्मळा :** संत चोखोबांच्या या धाकट्या भगिनी. पंढरीच्या पांडुरंगाची सेवा सतत घडावी एवढी एकच ओढ त्यांना होती. ती ओढ त्यांच्या अभंगातून प्रकट होते.

प्रस्तुत अभंगात संत निर्मळा यांनी परमेश्वराविषयीचा उत्कट भक्तिभाव वर्णन केलेला आहे.

अनाथांचा नाथ कृपावंत देवा ।
घडो तुमची सेवा अहर्निशीं ।।१।।

अठ्ठाविस युगें विटेवरी उभा ।
वामभागीं शोभा रुक्मादेवी ।।२।।

पतित पावन गाजे ब्रीदावळी ।
पुरवावी आळी हीच माझी ।।३।।

उभा विटेवरी ठेवोनी चरण ।
म्हणतसे बहिण चोखियाची ।।४।।

सकलसंतगाथा खंड पहिला : संत निर्मळा-अभंग ,
अभंग क्रमांक १८
संपादक : प्रा. डॉ. र. रा. गोसावी.

## स्वाध्याय

**प्र.१. खालील आकृतिबंध पूर्ण करा.**

(अ) **संत निर्मळा यांनी परमेश्वरासाठी वापरलेली विशेषणे.**

(आ) संत निर्मळा यांचे परमेश्वराकडे मागणे.

संत निर्मळा यांनी परमेश्वराकडे केलेला हट्ट.

**प्र. २. संत निर्मळा यांनी पांडुरंगाचे खालील बाबतींत केलेले वर्णन**

| कुठे उभा आहे? | किती काळ उभा आहे? | वामभागीं कोण आहे? |
| --- | --- | --- |
| | | |

**प्र. ३. नातेसंबंध सांगा.**

(अ) संत निर्मळा – संत चोखामेळा –

(आ) पंढरीचा पांडुरंग – संत निर्मळा –

(इ) पंढरीचा पांडुरंग – रुक्मादेवी –

**प्र. ४. स्वमत.**

(अ) संत निर्मळा यांचा परमेश्वराविषयीचा भक्तिभाव तुमच्या शब्दांत लिहा.

(आ) परमेश्वराला 'अनाथांचा नाथ' व 'पतित पावन' असे का म्हटले असावे? त्याविषयीचे तुमचे मत लिहा.

(इ) तुमच्या आवडीच्या संताविषयी थोडक्यात माहिती लिहा.

FYHNCH

# ३. पाळण्यातले पाय

**राजा मंगळवेढेकर** (१९२५-२००६) : बालसाहित्यकार, चरित्रकार, कवी. 'गंमत जंमत', 'चॉकलेटचा बंगला', 'अगडंबगडं', 'बाळांसाठी गाणीच गाणी', 'आभाळमित्र' (भाग १, भाग २), 'तेनालीरामच्या चातुर्यकथा' इत्यादी पुस्तके; 'हरवलेले आभाळ', 'झाडांची गाणी झाडांच्या गोष्टी' हे ललितनिबंधही प्रसिद्ध.

न्यूटनच्या बालपणातील चौकसपणाची चुणूक दाखवणारे अनेक प्रसंग प्रस्तुत पाठात वर्णन केले आहेत.

एका नदीच्या काठी एक लहानसे घर होते. त्या घरात आयझॅक हा मुलगा आणि त्याची म्हातारी आजी राहत होती. मुलगा मोठा चतुर आणि बोलका होता. तो दिवसभर आपल्या म्हाताऱ्या आजीला 'हेच का? तेच का? असेच का? तसेच का?' असे नाना प्रश्न विचारून भंडावून सोडी. रोज आजूबाजूला दिसणाऱ्या गोष्टी, होणाऱ्या घडामोडी या साऱ्यांबद्दलचे एक विशेष कुतूहल या मुलामध्ये जागे होई, म्हणूनच पाऊस पडू लागला, की हा विचारी, ''आजी, हे पाणी कुठून येतं ग?''

जोरदार वाऱ्याने घराच्या खिडक्या वाजू लागल्या, की हा विचारी, ''आजी, वारा कुठं राहतो ग?''

नदीत टाकलेला कागदाचा कपटा, चिंधी, गवताची काडी पाण्याबरोबर चाललेली पाहिली, की हा विचारी, ''आजी, नदीच्या पाण्याबरोबर हे पदार्थ वाहत का जातात?'' म्हातारी आजी सांगता येईल तेवढे त्याला सांगे; पण कधी-कधी तिलाही माहीत नसे, अशा वेळी ती तरी काय सांगणार त्याला? मग काहीतरी सांगून ती वेळ मारून नेई, तर कधी गप्प बसून राही.

पण या मुलाला मात्र चैन पडत नसे. त्याच्या शंकेचे बरोबर उत्तर मिळाल्याशिवाय त्याला समाधान लाभत नसे. त्यासाठी तो मग शेजाऱ्यापाजाऱ्यांकडे जाऊनही प्रश्न विचारत बसे. कधी कधी तासन्‌तास आभाळाकडे टक लावून बसे, तर कधी नदीकिनारी तहानभूक विसरून जाई!

एके दिवशी तो असाच खडकावर नदीच्या पाण्यात पाय सोडून बसला होता. घरात म्हातारी आजी जात्यावर धान्य दळत होती. जात्याचा घर्‌घर्‌ आवाज ऐकू येत होता. मुलाचे कान त्या फिरत्या जात्याच्या आवाजाकडे नि डोळे वाहत्या पाण्याकडे होते. चटकन त्याच्या मनात आले, 'हे पाणी दगड-गोट्यांनाही आपल्याबरोबर वाहून नेत आहे! एवढी शक्ती जर या वाहत्या पाण्यात आहे, तर मग याच्याकडून आणखी काही काम का करून घेऊ नये?'

ठरलेच. मनाशी निर्णय पक्का झाला. तो उठला. घरी गेला. त्याने आपली पुरचुंडी काढली. आजीने वेळोवेळी खाऊसाठी दिलेले पैसे काटकसरीने खर्च करून त्याने ही पुंजी जमा केली होती. त्या पैशांतून त्याने काही वस्तू खरेदी केल्या. नदीकिनारी खडकावर बसूनच त्याने एक चक्र तयार केले. ते चक्र त्याने एका सळईला जोडले. पाण्याच्या जोराने चक्र फिरेल अशा रीतीने ती त्याने प्रवाहाजवळ बसवली. पाण्याच्या प्रवाहाने चक्र फिरू लागले, तशी सळई ही फिरू लागली!

फिरते चक्र पाहून त्या मुलाला एवढा आनंद झाला, की तो धावत-धावतच घरी आजीकडे गेला आणि म्हणाला, ''आजी, आजी, माझे फिरते चक्र पाहायला चल!''

आजी त्याच्याबरोबर गेली; पण तेवढ्यात त्याच्या मित्रांनी चक्र मोडूनतोडून टाकले होते, कारण तो एकटाच काहीतरी करत बसलेला पाहून ते त्याच्यावर चिडलेले होते. तो राग त्यांनी असा काढला होता. तिथे काहीच नाही हे पाहून आजीलाही मुलाचा राग आला. त्याचे असले तऱ्हेवाईक बोलणे नि वागणे तिलाही पसंत नव्हते. शेवटी मुलाने नीट शिकावेसवरावे, म्हणून तिने त्याला दुसऱ्या एका गावच्या शाळेत ठेवले.

एकदा काय झाले, वर्गात गुरुजी धडा समजावून देत होते; पण हा मुलगा मात्र खिडकीतून बाहेर बघण्यात दंग झाला होता. त्याचे गुरुजींकडे काही लक्ष नव्हते. हे पाहून गुरुजींना राग आला. त्यांनी रागानेच विचारले, ''बाहेर काय बघतोस?''



मुलाने उत्तर दिले, ''गुरुजी, ते पाहा, ढग कसे धावताहेत आभाळात! हवेत केवढी शक्ती आहे नाही? पाहा, पाहा ढगांना कशी पळवत नेत आहे ती! हवेत जर एवढी शक्ती आहे तर तिचा उपयोग का नाही करून घेतला जात?''

''सांग हवेला हात वर करून, म्हणजे तुलाच ती उडवून नेईल!'' गुरुजी म्हणाले. सारा वर्ग खो खो हसू लागला; पण त्या मुलाने आपला छंद काही सोडला नाही. त्याचे विचारचक्र फिरतच राहिले. त्याच वेळी गावाबाहेरच्या डोंगराजवळ एक प्रचंड पवनचक्की बसवण्यात येणार आहे असे त्याला कळले. ही बातमी कळताच हा मुलगा ताबडतोब तिकडे गेला. पाहतो तो खरेच काही मजूर पवनचक्कीचे मोठमोठे पंख तिथे बसवत होते. त्याला फार आनंद झाला. त्याचे औत्सुक्य वाढले. त्याने त्या मजुरांना कितीतरी प्रश्न विचारले– 'हे काय नि ते काय? असं का नि तसं का?'

तिथेच त्याच्या एका मित्राचे वडील होते. या मुलाची उत्सुकता पाहून त्यांना कौतुक वाटले. त्यांनी या मुलाला पवनचक्कीसंबंधीची सर्व माहिती समजावून दिली. ही माहिती मिळताच त्याला वाटू लागले, की ही मोठी पवनचक्की तयार होण्याच्या आत आपण लहान पवनचक्की तयार करावी!

मनात येताच स्वारी त्याच कामाला लागली. आवश्यक वस्तू जमवल्या आणि बऱ्याच खटाटोपानंतर त्याने पवनचक्की तयार केली. मोठी पवनचक्की तयार होण्याच्या आत याची छोटी पवनचक्की फिरायलाही लागली!

या मुलाचे हे कर्तृत्व पाहून लोकांनीही त्याची तारीफ केली. त्याला शाबासकी दिली; पण या मुलाचे समाधान एवढ्याने काही होईना. तो विचारमग्नच होता. आपल्या तंद्रीतच होता.

एका मित्राने विचारले, ''आता रे कसला विचार करतोयस?''

तो म्हणाला, ''ही पवनचक्की फिरते आहे ती हवेच्या जोरावर; पण भिंतीमुळे पुरेशी हवा घरात येत नाही, म्हणून व्हावे तेवढे काम होत नाही.''

तेवढ्यात एक पिटुकला उंदीर तिथून पळाला. पळताना त्याच्या धक्क्याने ती छोटी पवनचक्की फिरली. ते पाहून त्याला चटकन युक्ती सुचली. त्याने एक लहानसा डबा तयार केला. एक खिळा ठोकून तो पवनचक्कीला जोडला. मग एक मोठा उंदीर पकडून त्या डब्यात बंद करून ठेवला. डब्यातला उंदीर बाहेर पडण्यासाठी जोरजोराने डब्यातल्या डब्यात फिरू लागला. त्या उंदराबरोबर डबाही फिरायला लागला आणि त्याबरोबर पवनचक्कीही फिरायला लागली.

आता मात्र त्या मुलाला खराखुरा आनंद झाला. त्याने घेतलेल्या कष्टाचे, श्रमाचे फळ त्याला मिळाले होते. त्याच सुमारास त्याची आजी त्याला भेटायला म्हणून तिथे आली. तिने आयझॅकबद्दल गुरुजींकडे चौकशी केली तेव्हा ते म्हणाले, ''मुलाचे पाय पाळण्यात दिसतात. आयझॅक न्यूटन मोठा वैज्ञानिक म्हणून नाव मिळवील.''



गुरुजींची ही भविष्यवाणी पुढे खरी ठरली. हाच मुलगा पुढे महान संशोधक म्हणून अमर झाला. यानेच झाडावरून खाली पडणारे फळ पाहून पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षण शक्तीचा शोध लावला.

आधुनिक विज्ञानाला न्यूटनने ही मोठी देणगी दिली.


◆◆◆

## स्वाध्याय

**प्र.१. (अ) आयझॅकच्या खालील गुणांचे एक उदाहरण लिहा.**

| (१) आयझॅकचा चौकसपणा | (२) आयझॅकचा बोलकेपणा |
|---|---|
| | |

**(आ) फिरत्या चक्राच्या निर्मितीचा ओघतक्ता तयार करा.**




**(इ) आयझॅकचे खालील बाबतींतील विचार लिहा.**

(१) पाण्याबाबतचा विचार (२) हवेबाबतचा विचार

**प्र.२. खालील वाक्यांतून आयझॅकचे कोणते गुण दिसून येतात ते कंसातील यादीतून शोधा व लिहा.**

(सृजनशील, जिज्ञासू, कुतूहल, आळशी, कर्तव्यतत्पर, अबोल)

(अ) ''पाहा, ढगांना कशी पळवत आहे ती.''

(आ) उंदराबरोबर डबाही फिरायचा आणि पवनचक्कीही.

(इ) मोठी पवनचक्की तयार व्हायच्या आत आपण लहान पवनचक्की तयार करावी!

(ई) ''आजी, वारा कुठे राहतो?''

**प्र.३. कारणे लिहा.**

(अ) आजीला राग आला, कारण............

(आ) आजीने आयझॅकला दुसऱ्या गावच्या शाळेत टाकले, कारण............

**प्र.४. खालील वाक्प्रचाराचा व म्हणीचा योग्य अर्थ शोधा व लिहा.**

(अ) चैन न पडणे.

(१) चैन करणे.

(२) मजा करणे.

(३) अस्वस्थ होणे.

(आ) मुलाचे पाय पाळण्यात दिसतात.

(१) पायावरचे पांघरूण बाजूला होणे.

(२) बालवयातच त्याच्या भविष्यातील कर्तृत्वाची चुणूक दिसणे.

(३) मुलाने पांघरूण फेकून देणे.

**प्र.५. स्वमत.**

(१) न्यूटनच्या बालवयातील तुम्हांला आवडलेला प्रसंग लिहा.

(२) मोठेपणी तुम्हांला कोण व्हावेसे वाटते? त्याविषयीचे तुमचे मत सकारण शब्दबद्ध करा.

## भाषाभ्यास

**✻ खालील वाक्ये वाचा.**

(१) मी शाळा जातो.

(२) मी शाळेत जातो.

ही दोन वाक्ये तुम्ही वाचलीत. यांपैकी पहिले वाक्य चुकीचे आहे आणि दुसरे वाक्य बरोबर आहे. या दोन्ही वाक्यांमध्ये काय फरक आहे? पहिल्या वाक्यात 'शाळा' हा शब्द आहे. दुसऱ्या वाक्यात 'शाळा' या शब्दाला '-त' हा प्रत्यय लागला आहे.

**✻ खालील वाक्ये वाचा.**

(१) राम मित्राशी बोलतो.

(२) रेश्मा पालीला घाबरते.

(३) कल्पना दुकानात जाते.

या वाक्यांमध्ये, मित्र, पाल, दुकान या नामांना अनुक्रमे -शी, -ला, -त हे प्रत्यय जोडलेले आहेत. प्रत्यय लागण्यापूर्वी या शब्दांमध्ये काही बदल झाले आहेत. उदा., मित्र~मित्रा-, पाल~पाली-, दुकान~दुकाना-. शब्दाला प्रत्यय लागण्यापूर्वी होणाऱ्या या बदलाला शब्दाचे **सामान्यरूप** म्हणतात. शब्दाच्या मूळ रूपाला **सरळरूप** म्हणतात. उदा., 'दुकान' हे सरळरूप आणि दुकाना- हे सामान्यरूप.

नामांना किंवा सर्वनामांना लागणारे प्रत्यय अनेक प्रकारचे असतात. -ला, -त, -ने, -शी, -चा, -ची, -चे इत्यादी.

नामांना व सर्वनामांना प्रत्ययांबरोबरच शब्दयोगी अव्यये जोडली जातात, तेव्हा सुद्धा त्यांचे सामान्यरूप होते.

# ४. दादू

**वि. स. खांडेकर** (१८९८-१९७६) : 'ज्ञानपीठ' पुरस्कार विजेते साहित्यिक. कादंबरीकार, कथाकार, लघुनिबंधकार, समीक्षक, पटकथालेखक. 'दोन ध्रुव', 'उल्का', 'हिरवा चाफा', 'पांढरे ढग', 'जळलेला मोहोर' इत्यादी कादंबऱ्या; 'वायुलहरी', 'चांदण्यात', 'सायंकाळ' इत्यादी लघुनिबंधसंग्रह; 'अश्रु', 'ययाति', 'अमृतवेल' या त्यांच्या प्रसिद्ध कादंबऱ्या आहेत.

आईप्रमाणे काळजी घेणाऱ्या दादूच्या प्रेमळ व संवेदनशील वर्तनाचे भावस्पर्शी वर्णन प्रस्तुत पाठात लेखकांनी केले आहे.

मी इथे शिकायला आलो होतो. दोन खोल्यांचे घर मिळाले होते आणि मालकातर्फेच दादू नावाचा अनुभवी गडीही लाभणार होता. दादू ही व्यक्ती वरवर पाहिली, तर जरा विचित्रच दिसत होती. एक खांदा विचित्र रीतीने उडवत चालण्याची त्याची लकब होती.

वाढलेली दाढी खाजवत तो माझ्याशी बोलू लागला तेव्हा माझ्या मनात आले, या म्हाताऱ्याला आपण गडी म्हणून ठेवणे महामूर्खपणाचे होईल.

ही पीडा चुकवायची एक नवीन युक्ती मला सुचली. दादूचा पूर्वीचा पगार फक्त तीन रुपये होता. आता तो चार किंवा पाच रुपये मागेल आणि तसे मागितले, की तुझ्यासारखा लबाड मनुष्य मला नको, असे आपल्याला सहजच म्हणता येईल.

असा विचार करून मी दादूला म्हटले, ''मी सांगेन ते काम करावं लागेल तुला.''

त्याने मोठ्या आनंदाने मान डोलावली.

''पगार काय घेणार तू?'' मी प्रश्न केला.

त्याने हसत उत्तर दिले, ''पूर्वी मिळत होता तेवढाच द्या!''

''अरे, पण तेवढा म्हणजे किती?'' आता याची लबाडी कळणार या कल्पनेने मी हसत हसत विचारले.

''तीन रुपये,'' दादूने उत्तर दिले.

मी चकित झालो. या अडाणी गड्यातला प्रामाणिकपणा दिसताच माझ्या मनात एक उज्ज्वल छटा चमकून गेली.

मी काहीच बोलत नाही, असे पाहून दादू म्हणाला, ''पावणेतीन रुपयांवरसुद्धा राहीन मी साहेब.''



दादूच्या रूक्ष दिसण्याच्या आड एक वेगळे सौंदर्य आहे असा मला भास झाला.

हा भास क्षणिक नव्हता.

'मी सांगेन ते काम करायला हवं,' असे कामावर ठेवताना मी दादूला बजावले होते; पण मला त्याला काही सांगण्याचा प्रसंगच येत नसे. मी सकाळी उठण्याच्या आधीच गवळ्याच्या घरून तो दूध घेऊन येई. मी उठून चूळ भरायला लागलो, की दादूचा स्टोव्ह फरफरू लागे. मला चहात

कमी साखर लागते, हे त्याला दुसऱ्यांदा काही सांगावे लागले नाही. मला काडीचाही त्रास होऊ नये, म्हणून तो जी धडपड करी ती पाहिली, की मला आईची आठवण होई.

दादू पंपाने पाणी काढू लागला, की माझ्या मनात येई– या खडकाळ जागेच्या पोटात जसा पाण्याचा झरा आहे, त्याप्रमाणे वरून रूक्ष दिसणाऱ्या दादूच्या अंत:करणातही प्रेमाचा एक गोड झरा आहे.

दादूने माझी सर्व माहिती केव्हाच काढून घेतली होती; पण स्वत:विषयी मात्र तो फारसा बोलत नसे. एकदोनदा रंगात येऊन त्याने आपली थोडीफार माहिती मला सांगितली होती.

त्याचा मुलगा माझ्याएवढाच होता. सोलापूरला कुठल्याशा गिरणीत होता तो. दादूच्या खेड्यातला जमिनीचा एक तुकडा सावकाराकडे खूप दिवस गहाण पडला होता. म्हातारपणामुळे शेती होईनाशी झाली, तेव्हा बायकोला घेऊन तो इथे आला आणि त्याने मुलाला सोलापूरला पाठवले. फार उशिरा झालेला एकुलता एक मुलगा होता तो त्याचा. ''तुम्ही आई-बाप सोलापूरला मुलाकडेच का राहत नाही?'' म्हणून मी त्याला विचारले. तेव्हा त्याने सांगितले, ''आम्ही दोघं सोलापूरला गेलो, की तिथं पोराचा खर्च वाढणार, मग तो सावकाराकडली जमीन सोडवून कशी घेणार? बायको इथं कडधान्ये विकून चार पैसे मिळवते. सोलापुरात ती काय करणार? तिथं मोड खपतात की नाही कोण जाणे नि सोलापुरात इथल्यासारखी कॉलेजं नाहीत, तेव्हा माझ्यासारख्या म्हाताऱ्याला तिथं कोण काम देणार?''

''पण मुलावाचून कसं करमतं रे तुला?''

''न करमायला काय झालं साहेब? तुम्ही नाही का आलाय आईवडिलांना सोडून. तसाच माझा मुलगा मला सोडून गिरणीत गेलाय. मी इथं तुमचं काम करतोय ना, सोलापुरात अशीच कुणीतरी म्हातारी त्याला जेवायला घालत असेल.''

तीन महिन्यांत दादूची नि माझी कमीत कमी तीन वर्षांची ओळख आहे असे वाटू लागले.

क्रिकेट जोरात सुरू झाल्यामुळे कित्येकदा रात्री आठ वाजेपर्यंत मी बिऱ्हाडी येत नसे; पण मला कितीही उशीर झाला तरी ओट्यावर अंधारात दादू माझी वाट पाहत बसलेला असे. एखाद्या दिवशी मला यायला उशीर झाला नि डब्यातला भात थंड झाला, तर दादू लगेच स्टोव्ह पेटवायला उठे. थंडगार झालेला भात स्टोव्हवर तापवला, म्हणून त्याला ऊनउनीत भाताची गोडी कशी येणार? पण दादूने ऊन केलेला तो भात खाताना मला फार गोड वाटे. त्या गोडीचा उगम अन्नात नव्हता, दादूच्या मनात होता.

एका रविवारी दादूची स्वारी क्रिकेटच्या मैदानावर दिसली, तेव्हा तर मी थक्कच झालो. रात्री मी त्याला विचारले, तेव्हा म्हातारा लाजेने अगदी चूर झाला; पण थोड्या वेळाने त्याने ते कारण सांगितले. आदल्या दिवशी मी फार चांगला खेळलो होतो. दादू सकाळी खाणावळीत डबा आणायला गेला, तेव्हा तिथल्या विद्यार्थ्यांत माझ्या पराक्रमाच्याच गोष्टी चालल्या होत्या. त्या ऐकून दादूला वाटले, आपल्या साहेबांच्या खेळाची सारे लोक इतकी स्तुती करतात तेव्हा आपणही तो पाहावा.

सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात बाहेरगावी एक सामना ठरला. जहागीरदार नावाचा माझ्याच कॉलेजातला एक मित्र आमचा कप्तान होता. माझी फलंदाजी नि त्याची गोलंदाजी. असा धुव्वा उडवला आम्ही दुसऱ्या बाजूचा!

परत येताना मी जहागीरदारच्या गाडीमध्ये बसलो. गाडी हाकणे आणि सामन्याच्या गप्पा मारणे या दोन गोष्टींपैकी अधिक बेफामपणे तो कोणती गोष्ट करत होता, हे सांगणे फार कठीण होते.

खेळताना मनुष्याला भान नसते. त्यामुळे खेळाच्या श्रमाने माझे अंग किती आंबून गेले आहे, याची कल्पना गाडीत बसेपर्यंत मला आली नाही, मग मात्र अंग ठणकू लागले.

माझ्या बिऱ्हाडापाशी गाडी येताच मी उतरू लागलो, तेव्हा जहागीरदार म्हणाला, ''आमच्या बंगल्यावर चल की.''

''अंग फार दुखतंय,'' मी म्हटलं. ''माझ्याच खोलीवर आपण चहा घेऊ.''

''चहा!'' तो मोठ्याने हसत म्हणाला, ''माझंसुद्धा अंग दुखतंय. चहानं नाही बरं वाटणार आता.''

''मग काय मागवू?''

'बिअर,'' तो शांतपणे म्हणाला. दादू ते ऐकत होता.

मी विचारात पडलो. सापावर पाय पडावा तसा दादू दचकला आणि भूत दिसले, तर मनुष्य ज्या दृष्टीने त्याच्याकडे पाहील, त्या दृष्टीने तो माझ्याकडे बघू लागला.

मी म्हटले, ''अगदी धावत जा! जहागीरदारला हवी आहे.''

''तो जहागीरदार असेल, नाहीतर राजा असेल. मी जाणार नाही.''

मी हळूच म्हटले, ''दादू, या महिन्याला तुला एक रुपया जास्त देईन. मुकाट्यानं जा नि —''

''एक सोडून शंभर रुपये दिलेत तरी —''

दादूने माझी नोट फेकून दिली.

मी संतापाने म्हटले, ''नोकरीवर ठेवलं तेव्हा, मी सांगेन ते काम करायचं कबूल केलं होतंस तू. आताच्या आता गेलास तर बरं आहे. नाही तर —''

''नाही तर माझी नोकरी जाईल. होय ना? नमस्कार साहेब, असली कामं करून जगण्यापेक्षा पोटात काटे भरीन, पण —''

त्याचा आवाज घोगरा झाला होता. डोळेही भरून आले होते. पुढे एक शब्दही न बोलता तो चालू लागला.

माझी मलाच लाज वाटू लागली. मी धावत गेलो. दादू फाटक उघडत होता. मी त्याचा हात धरून म्हटले, ''दादू, कुठं चाललास?''

''तुमच्या आईसाहेबांकडं!''

''माझ्या आईकडं!''

''हो!''

''कशाला?''

''त्यांच्या झाडाला कीड लागलीय हे सांगायला!''

रागीट स्वराने मी उद्‌गारलो, ''मी वाटेल ते करीन. तुला काय करायचं त्याच्याशी?''

''मला काय करायचं? मला माझ्या मुलाला सांभाळायचंय.''

''तुझा मुलगा तर सोलापुरात आहे?''

''होय साहेब, तिथं तो काही भलतं-सलतं करायला लागला, तर त्याच्याजवळ असलेल्या म्हाताऱ्यांनी त्याला आवरायला नको का? तिथं लोकांनी त्याला सांभाळायला हवं. मग इथं मी-''

त्याच्या डोळ्यांतून घळघळ पाणी वाहू लागले.

त्याच्या पाठीवरून हात फिरवत मी म्हटले, ''रडू नकोस दादू. तुझी नोकरी कायम आहे.''

''नोकरीकरिता मी रडत नाही साहेब. तुमच्याऐवजी माझा मुलगा असता, तर मला जेवढं दुःख झालं असतं, तेवढं मघाशी तुम्ही दुकानावर जायला सांगितलं, तेव्हा झालं.''

दादूचा हात धरून मी त्याला घरात नेले.

मी खोलीत गेल्याबरोबर जहागीरदार म्हणाला, ''कुठं गेला होतास?''

''बाहेर तारवाला आला होता.''
''तार? कुणाची तार आली बुवा या वेळी?''
''आईची. फार आजारी आहे ती!''
मी घाईघाईने ट्रंक उघडली. खुंटाळ्यावरचे कपडे काढले आणि सामानाची बांधाबांध करू लागलो.
जहागीरदार म्हणाला, ''बरं, मी जातो हं.''
त्याला दारापर्यंत सोडून परत आलो. दादू एखाद्या लहान मुलाप्रमाणे हसत उभा होता.



◆◆◆

## स्वाध्याय

**प्र. १. (अ) खालील चौकटी पूर्ण करा.**

(१) दादूची लकब –
(२) लेखकाचा छंद –
(३) दादूच्या मुलाचे नोकरी करायचे ठिकाण –

**(आ) दादूचे खालील बाबतीतील वर्णन करा.**

दादू
काम
गुण

**प्र. २. का ते लिहा.**

दादू दचकला.
दादू लहान मुलासारखा हसू लागला.
का ?

**प्र. ३. (अ) खालील वाक्यांत कंसातील वाक्प्रचार योग्य ठिकाणी वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

(अंग आंबून जाणे, धुव्वा उडवणे, काडीचाही त्रास न होणे, थक्क होणे.)
(१) आम्ही ताजमहालचे सौंदर्य बघून आश्चर्यचकित झालो.
(२) भारताच्या क्रिकेट संघाने इंग्लंडला हरवले.
(३) बैलगाडीच्या प्रवासाने माझे अंग थकून गेले.
(४) प्रवासात मला अजिबात त्रास झाला नाही.

**(आ) खालील शब्दांना पाठातील विशेषणे शोधा.**

| विशेषणे | | विशेष्ये |
|---|---|---|
| | – | गडी |
| | – | जागा |
| | – | झरा |
| | – | स्वर |

**(इ) खालील शब्दांना पाठातील विरुद्धार्थी शब्द शोधा.**

(१) कुरूप × ______  (२) कडू × ______

(३) गरम × ______

**प्र. ३. स्वमत.**

(१) 'दादूने लेखकाच्या मित्राच्या कामाला नकार दिला', ही घटना तुम्हाला काय शिकवते ?

(२) 'दादू' च्या स्वभावातील गुणविशेष तुमच्या शब्दांत लिहा.

(३) पाठातील तुम्हांला सर्वांत आवडलेली बाब तुमच्या शब्दांत लिहा.

**उपक्रम :** 'दादू' या पाठाचा आशय कथारूपाने लिहा.

## भाषा सौंदर्य

खाली दिलेल्या कंसातील शब्दांना (क्रियापदांना) 'ईव' प्रत्यय जोडून विशेषणे तयार करा व त्यांच्यासाठी समर्पक विशेष्य शोधून लिहा.

उदा., आखणे - आखीव - आखीव कागद.

(रेखणे, कोरणे, ऐकणे, घोटणे, राखणे) यांसारख्या इतर शब्दांचा शोध घ्या.

## भाषाभ्यास

✲ **अधोरेखित शब्दांविषयी खालील माहिती भरून तक्ता पूर्ण करा.**

| वाक्ये | सरळरूप | सामान्यरूप | प्रत्यय |
|---|---|---|---|
| (१) <u>रमेशचा</u> भाऊ <u>शाळेत</u> गेला. | (१)<br>(२) | | |
| (२) <u>बँकेने</u> <u>शेतकऱ्याला</u> कर्ज दिले. | (१)<br>(२) | | |
| (३) <u>सुट्टीत</u> तो <u>मित्रांशी</u> खेळतो. | (१)<br>(२) | | |
| (४) <u>मंडईत</u> <u>फळांच्या</u> गाड्या आहेत. | (१)<br>(२) | | |

GBJSYU

# ५. अजिंठ्याची सहल

**पं. महादेवशास्त्री जोशी** (१९०६-१९९२) : कथालेखक, संस्कृतिकोशाचे संपादक. वेदान्त, व्याकरण, ज्योतिष, काव्यशास्त्र याचे अध्ययन. 'खडकांतील पाझर', 'विराणी', 'कथाकांता', 'घररिघी', 'कथासुगंध', 'कल्पवृक्ष' हे कथासंग्रह प्रसिद्ध.

प्रस्तुत पाठात अजिंठ्याच्या सहलीचे वर्णन केले आहे. भारतातील आश्चर्यांपैकी एक आश्चर्य म्हणजे ही अजिंठ्याची लेणी होय.



मुलांनो, चला, उतरा. आलं अजिंठा. आता आणखी चढून गेलं, की तुम्हांला अजिंठ्याची लेणी पाहायला मिळतील. पाहिलीत ही गर्दी! परदेशांतील काही मंडळीही लेणी पाहायला आली आहेत. लांबलांबचे लोक इथे येतात. चला, आता आपण लेण्यांकडेच जाऊ.

आता समोरच्या डोंगरदरीकडे पाहा. कशी अर्धचंद्रासारखी दिसते, नाही? या डोंगरदरीच्या पोटात तीस गुंफा आहेत. हीच अजिंठ्याची लेणी. ती पाहा, काही लेणी दिसायला लागली. थांबा. आधी थोडीशी माहिती घ्या, म्हणजे आपण काय पाहतो ते नेमकं तुम्हांला कळेल.

आत शिरलात, की काही गुंफांत तुम्हांला प्रशस्त लांबरुंद दालनं दिसतील. चार-पाच मीटर त्याची उंची. वर सपाट छत. दोन्ही बाजूंना भव्य स्तंभ कोरलेले अन् नक्षीदार प्रवेशद्वारावर अर्धवर्तुळाकृती गवाक्षे. गवाक्षे म्हणजे हवा व उजेड आत येण्यासाठी खिडक्या. चला, माझ्यामागून ओळीने या.

आत शिरताच गारेगार वाटलं ना? उन्हातान्हातून प्रवास केल्याचा शिणवटा निघून गेला की नाही? लेण्यांतली हवा अशीच नेहमी गारेगार असते.

आता समोर लक्ष द्या. केवढा प्रशस्त चौथरा आहे हा! आणि त्यावर कोण बसलं आहे सांगा बरं! 'भगवान गौतम बुद्ध'. बुद्ध ओळखण्याची खूण म्हणजे पद्मासन घालून बसलेले, डोळे अर्धवट मिटलेल्या कमळासारखे आणि नजर नाकाच्या शेंड्यावर खिळलेली. मुखावर करुणेचा भाव. कानाच्या पाळ्या लोंबलेल्या. जवळजवळ खांद्याला भिडलेल्या. मस्तकावर कुरळ्या केसांच्या जटा. एवढं लक्षात ठेवलंत, की तुम्हांला कोठेही गौतम बुद्ध ओळखता येतील.

इथल्या सगळ्या लेण्यांना नावं नाहीत; पण एकोणिसाव्या लेण्याला नाव आहे, त्याला म्हणतात गंधकुटी. हे लेणे तुम्ही सावकाशीनं पाहा. बराच वेळ लागेल, कारण ते आत, बाहेर व सगळीकडे कोरीव कामानं नटलं आहे. त्याच्यासमोर द्वारमंडप आहे. खांब सगळे वाटोळे. ते पाहा दुसरे बुद्ध. खाली नव्हे, वर दोन खांबांच्या कमानीत! इथे ते उभे आहेत अन् त्यांनी एक पायघोळ अंगरखा घातला आहे. त्याच्या चुण्या कशा अगदी स्पष्ट दिसतात. मुद्रासुद्धा किती शांत, किती गंभीर!

या गंधकुटी लेण्यात अन् सोळा व सतरा या क्रमांकांच्या लेण्यांत चित्रांची भरभार आहे. जिकडे पाहाल तिकडे चित्रंच चित्रं. साधी एकरंगी नव्हेत, तर बहुरंगी! रंग तरी कसे, तर सौम्य अन् टिकाऊ! यांतली बहुतेक चित्रं बुद्ध आणि त्याचा धर्म या विषयांचीच आहेत कारण बौद्ध धर्माच्या लोकांनीच ही

लेणी खोदली आहेत. गौतम बुद्धांच्या काही मजेदार कथा आहेत. त्यांना जातककथा असं म्हणतात. बुद्धांनी पूर्वी कोणत्या जातींत अन् प्राण्यांच्या रूपात जन्म घेतले, त्यांच्या त्या कथा आहेत. त्यांपैकी कित्येक कथा या लेण्यांत चित्रित केल्या आहेत.

सोळाव्या लेण्यातली सगळी चित्रं बुद्धांच्या शेवटच्या जन्मातली आहेत. मुलांनो, तुम्ही ती ओळीनं पाहात चला. हे मायावतीला म्हणजे बुद्धांच्या आईला पडलेलं स्वप्न! बुद्ध जन्माला आल्याचा तो पुढचा देखावा, अन् ही पुढल्या चित्रातली गंमत बघितलीत? पाच वर्षांचे गौतम बुद्ध धूळपाटीवर बोटानं अक्षरं गिरवीत आहेत. पूर्वी पाट्या नव्हत्या अन् दगडी पेन्सिलीही नव्हत्या. अशा धूळपाटीवर बोटं झरेतो अक्षरं गिरवावी लागत. असं शेवटपर्यंत पाहात गेलात, तर सगळं बुद्धांचं चरित्रच इथं चित्रांकित झालेलं दिसेल.

ही तीस लेणी किती जुनी, किती प्राचीन आहेत सांगू! सुमारे दोन हजार वर्षांची! आपण ही सगळी लेणी तीन-चार तासांत पाहून मोकळे होतो; पण ती सगळी कोरायला किती वर्षे लागली, ठाऊक आहे? सुमारे आठशे! ऐकून आश्चर्य वाटले ना? अशी अनेक अद्‌भुत आश्चर्ये आपल्या भारतात आहेत. तुम्ही मोठेपणी ती पाहा अन् धन्य व्हा!

◆◆◆

## स्वाध्याय

**प्र. १. (अ) चौकटी पूर्ण करा.**

(१) डोंगरदरीचा आकार -
(२) एकोणिसाव्या लेणीचे नाव -
(३) भारतातील एक अद्‌भुत आश्चर्य -
(४) गौतम बुद्धाची आई -

**(आ) आकृती पूर्ण करा.**

(१) **गंधकुटीतील गौतम बुद्धाची वैशिष्ट्ये.**

(२) **गंधकुटीतील चित्रांची वैशिष्ट्ये.**

**(इ) संज्ञा स्पष्ट करा.**

गवाक्ष    जातककथा

**प्र. २. (अ) समर्पक उदाहरणे लिहा.**

(१) गौतम बुद्धांचा पाठात आलेला बालपणीचा प्रसंग -
(२) लेण्यांत शिरल्यानंतरचा अनुभव -

**(आ) पाठातील जोडशब्द शोधा.**

गारेगार, द्वारमंडप..................

(इ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.

(१) चढणे x

(२) बसणे x

(३) स्पष्ट x

(ई) खालील वाक्यांतील विरामचिन्हे ओळखा व त्यांची नावे लिहा.

(१) आत शिरल्यावर गारेगार वाटलं ना ?

(२) आपण ही सगळी लेणी तीन-चार तासांत पाहून मोकळे होतो; पण ती सगळी कोरायला किती वर्षे लागली, ठाऊक आहे?

(३) मुद्रासुद्धा किती शांत, किती गंभीर !

प्र. ३. स्वमत.

(१) तुमच्या मते अजिंठा लेणी आश्चर्यकारक असण्याची कारणे लिहा.

प्र. ४. 'लेण्यांतील हवा नेहमी गारेगार असते', यामागील वैज्ञानिक कारणाबाबत मित्रांशी चर्चा करा.

## भाषाभ्यास

### समास

* खालील वाक्ये वाचा व अभ्यासा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) सूर्याचा उदय झाला. | सूर्योदय झाला. |
| (२) प्रत्येक दिवशी त्याची प्रतिष्ठा वाढत गेली. | दिवसेंदिवस त्याची प्रतिष्ठा वाढत गेली. |

* खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

(१) दोन्ही गटांतील वाक्यांचा अर्थ एकच आहे का?

(२) दोन गटांतील शब्द सारखे आहेत का?

(३) अधोरेखित शब्दांमध्ये 'अ' गट आणि 'ब' गटातील शब्दांमध्ये कोणता फरक आहे?

बोलण्याच्या ओघात आपण शब्दातील परस्परसंबंध दाखवणारे विभक्ती प्रत्यय गाळून सुटसुटीत असे जोडशब्द बनवतो. शब्दांच्या अशा एकत्रीकरणाला **'समास'** असे म्हणतात. शब्दांच्या अशा एकत्रीकरणाने जो जोडशब्द तयार होतो त्याला **'सामासिक शब्द'** म्हणतात.

**समास विग्रह –**

सामासिक शब्द कोणत्या शब्दांपासून तयार झाला, हे स्पष्ट करण्यासाठी आपण त्याची फोड करतो. या फोड करून दाखवण्याच्या पद्धतीला 'विग्रह' म्हणतात. वर 'ब' गटात सामासिक शब्द आहेत, तर 'अ' गटात विग्रह आहेत.

C8TP1K

# ६. बिनभिंतीची शाळा

**ग. दि. माडगूळकर** (१९१९-१९७७) : प्रसिद्ध कवी, गीतकार, लेखक, पटकथालेखक, कादंबरीकार, गीतरामायणकार. 'जोगिया', 'चैत्रबन', 'वैशाखी', 'पूरिया' इत्यादी गीतसंग्रह; 'गीतगोपाल', 'गीतसौभद्र' ही काव्यनिर्मिती; 'कृष्णाची करंगळी', 'तुपाचा नंदादीप' हे कथासंग्रह; 'आकाशाची फळे', 'उभे धागे आडवे धागे' या कादंबऱ्या प्रसिद्ध. भारत सरकारने 'पद्मश्री' हा किताब देऊन त्यांचा गौरव केला.


प्रस्तुत कवितेत अनौपचारिक शिक्षणाचे महत्त्व कवीने सोप्या, सरळ शब्दांत मांडले आहे.

बिन भिंतीची उघडी शाळा
लाखो इथले गुरू
झाडे, वेली, पशू, पाखरे
यांशी गोष्ट करू

बघू बंगला या मुंग्यांचा
सूर ऐकूया त्या भुंग्यांचा
फुलाफुलांचे रंग दाखवित
फिरते फुलपाखरू

हिंडू ओढे, धुंडू ओहळ
झाडावरचे काढू मोहळ
चिडत्या, डसत्या मधमाश्यांशी
जरा सामना करू

भल्या सकाळी उन्हात न्हाऊ
ऐन दुपारी पऱ्ह्यात पोहू
सायंकाळी मोजू चांदण्या
गणती त्यांची करू



## स्वाध्याय

प्र.१. (अ) आकृती पूर्ण करा.

कवितेतून तुम्हांला कळलेले निसर्गातले गुरू

↓ ↓ ↓

(आ) तक्ता पूर्ण करा.

| निसर्गातील घटक | त्यांच्याकडून माणसाने काय शिकावे ? |
|---|---|
| (१) झाडे | -------------------- |
| (२) पाखरे | -------------------- |
| (३) मुंग्या | -------------------- |
| (४) भुंगे | -------------------- |
| (५) मधमाश्या | -------------------- |

प्र.२. (अ) योग्य जोड्या जुळवा.

| निसर्गातील घटक | कार्य |
|---|---|
| (१) मुंग्या | (अ) मोहळ बांधतात. |
| (२) भुंगे | (आ) बंगला उभारतात. |
| (३) फुलपाखरू | (इ) सूर ऐकवतात. |
| (४) मधमाश्या | (ई) इकडून तिकडे उडतात. |

(आ) खालील मुद्द्यांच्या आधारे तुमची शाळा व बिनभिंतीची शाळा यांमधील तुलना करा.

| मुद्दे | तुमची शाळा | बिनभिंतीची शाळा |
|---|---|---|
| (१) इमारत | | |
| (२) शिक्षक | | |
| (३) विद्यार्थी | | |

(इ) कवितेतील यमक जुळणाऱ्या शब्दांच्या जोड्या शोधून लिहा.

(१) ______ ______
(२) ______ ______
(३) ______ ______

(ई) गटात न बसणारा शब्द ओळखा.

(१) झाडे, वेली, पशू, रोप
(२) सकाळ, दुपार, सायंकाळ, दिवस
(३) चंद्र, चांदण्या, आकाश, वारा
(४) झाडे, फुलपाखरू, मधमाशी, मुंगी

प्र.३.स्वमत.

(१) कवितेच्या शीर्षकाचा तुम्हांला समजलेला अर्थ स्वभाषेत लिहा.
(२) निसर्गातील घटकांमधून मिळणारा आनंद तुमच्या शब्दांत लिहा.
(३) 'निसर्ग हाच आपला खरा गुरू आहे.' हे विधान सोदाहरण स्पष्ट करा.

## भाषाभ्यास

※ खालील शब्दसमूहांपासून सामासिक शब्द तयार करा.

| शब्दसमूह | सामासिक शब्द |
|---|---|
| (१) ज्ञानरूपी अमृत | -------- |
| (२) पाच आरत्यांचा समूह | -------- |
| (३) प्रत्येक घरी | --------- |
| (४) लंब आहे उदर ज्याचे असा तो | --------- |
| (५) गुरू आणि शिष्य | --------- |

समासात कमीत कमी दोन शब्द असावे लागतात. त्याला 'पद' असे म्हणतात. त्या दोन पदांपैकी कोणत्या पदाला प्राधान्य आहे यावरून समासाचे प्रकार ठरतात.

| पद | प्रधान / गौण (कमी महत्त्वाची) | समासाचे नाव |
|---|---|---|
| (१) पहिले पद | प्रधान | अव्ययीभाव |
| (२) दुसरे पद | प्रधान | तत्पुरुष |
| (३) दोन्ही पदे | प्रधान | द्वंद्व |
| (४) दोन्ही पद | गौण | बहुव्रीही |

यावर्षी आपल्याला 'अव्ययीभाव' आणि 'द्वंद्व' हे दोन समास समजून घ्यायचे आहेत.

### १. अव्ययीभाव समास

**अव्ययीभाव समास वैशिष्ट्ये –** (१) पहिले पद महत्त्वाचे असून ते बहुधा अव्यय असते.

(२) संपूर्ण सामासिक शब्द क्रियाविशेषण अव्ययाप्रमाणे काम करतो.
(आ, यथा, प्रति वगैरे उपसर्गांना संस्कृतात अव्यय म्हणतात.)

उदा.,
(१) गरजूंना यथाशक्ती मदत करावी.
(२) त्या गावात जागोजागी वाचनालये आहेत.
(३) क्रांतिकारकांनी आमरण कष्ट सोसले.

**जागोजागी, घरोघरी यांसारख्या शब्दांत अव्यय दिसत नसले तरी त्याचा विग्रह अव्ययासारखा केला जातो, म्हणून अशा शब्दांचा समावेश अव्ययीभाव समासात केला जातो.**

- खालील शब्दसमूहांपासून सामासिक शब्द तयार करा.

(१) विधीप्रमाणे (२) प्रत्येक गल्लीत (३) चुकीची शिस्त (४) धोक्याशिवाय (५) प्रत्येक दारी

- खालील सामासिक शब्दांचा विग्रह करा.

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| (१) यथामती | |
| (२) हरसाल | |
| (३) गावोगाव | |
| (४) आमरण | |
| (५) यथाशक्ती | |

GC3K35

# ७. रंगलेला सामना

**लीलाधर हेगडे** (१९२७) : बालसाहित्यकार, कथाकार, कादंबरीकार, ललितगद्य लेखक. 'गुंतागुंत', 'फेडाफेडी', 'पुन्हा प्रपंच' इत्यादी ललितगद्य लेखन; 'तरीही हात शिवशिवतच राहिले' ही कादंबरी; 'बैलांचा गोंधळ' ही विनोदी कथा; 'थोर चित्रकार', 'पाचूचे बेट', 'वेरूळचे वैभव' 'हणमू' अशी अनेक बालसाहित्याची पुस्तके प्रसिद्ध. सन २०१५ साली साहित्य अकादमीने त्यांना 'बाल साहित्य पुरस्कारा'ने सन्मानित केले आहे.

प्रस्तुत पाठात लेखकांनी शाळेतील दोन इयत्तांमध्ये कबड्डीच्या रंगलेल्या सामन्याचे वर्णन केले आहे.

आज शाळेतील खेळांच्या सामन्यांचा शेवटचा दिवस होता, त्यामुळे आज सर्व खेळांचे अंतिम सामने होणार होते. सामने पाहायला विद्यार्थी, शिक्षक व अनेक पालक क्रीडांगणावर जमलेले होते.

कबड्डीच्या अंतिम सामन्यासाठी सहावी विरुद्ध सातवी हे संघ क्रीडांगणावर दाखल झाले. सर्वांनी टाळ्या वाजवून त्यांचे स्वागत केले.

ओली-सुकी झाली. सहावीच्या कर्णधाराने ओली-सुकी जिंकली. त्याने दम घालण्यास सुरुवात केली. सातवीचे खेळाडू तयारच होते. त्यांनी सहावीच्या कर्णधाराला चांगले कोपऱ्यात घेतले. कोपरा धरणाऱ्या मुलाने मोठ्या धीराने त्याचा पाय पकडला. त्याबरोबर मधल्या भिडूने त्याच्यावर एकदम झडप घालून त्याला पकडले. प्रेक्षकांतून जोरदार आरोळ्या उठल्या. सुरुवातीपासून सामना रंगायला सुरुवात झाली.

सातवीच्या संघाचा आवेश वाढला. त्यांचा हुकमी एक्का सावंत कबड्डी घालण्यास गेला. ''सावंत, पाच बाद पाहिजेत पाच!'' असे काही मुले ओरडली. सावंतच्या अंगात चांगलीच ताकद होती. त्याचे हाडपेरही मजबूत होते; पण सहावीच्या खेळाडूंनी त्याला पकडायचा निर्धार केला होता. सावंत आत आला, तशी सहावीच्या खेळाडूंनी साखळी धरली. बघता बघता त्याला त्यांनी घेरले; पण सावंत कसला वस्ताद! त्याने हां हां म्हणता साखळी तोडली व तो मध्यरेषेकडे तडफेने पोहोचला. त्याबरोबर आवाज उठले, ''शाब्बास सावंत, भले बहाद्दर!'' सहावीचे तीन गडी बाद झाले. प्रेक्षकांत धमाल उडाली.



मग सहावीचा चिवट सुळे कबड्डी घालण्यास गेला. मूर्ती लहान, पण कीर्ती महान! अत्यंत सावधपणे तो खेळत होता. इतक्यात एका खेळाडूने त्याचे पाय पकडण्यासाठी समोरून मुसंडी मारली. सुळेने त्याच्या पाठीवर हात ठेवून टुणकन उडी मारली व तो आपल्या संघाकडे सफाईने निघून गेला. ''शाब्बास सुळे!'' मुलांनी आरोळ्या ठोकल्या. सहावीचा कर्णधार जिवंत झाला.

सातवीच्या कर्णधाराने 'घाई करू नका!' असा खेळाडूंना इशारा दिला. आपला एक चपळ गडी दम घालण्यास पाठवला. सहावीचा एक गडी बाद करून तो चपळाईने परत आला, मग सहावीचा खेळाडू कबड्डी घालण्यास गेला. ''अरे याला धरा!'' असा प्रेक्षकांतून आवाज आला; पण या वेळी तो फारच सावध होता. पुन्हा चूक करायची नाही, असे त्याने ठरवले होते. एकही गडी न मारता तो परत आला.

सावंत या वेळी मोठ्या रुबाबात पुन्हा कबड्डी घालण्यास गेला. त्याचा दम संपत आला, इतक्यात सहावीच्या कर्णधाराने त्याची तंगडी पकडली. त्याबरोबर त्याने चपळाई केली; पण खेळाडूंनी त्याला मिठी मारून एकदम उचलले. त्याचा नाइलाज झाला. सावंत बाद झाला. प्रेक्षकांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. सहावीची मुले आता नाचू लागली. यशाचे पारडे कधी या बाजूला तर कधी त्या बाजूला झुकत होते. खेळ सुरू होऊन दहा मिनिटे झाली, पंचांनी शिटी फुंकून मध्यंतरासाठी खेळ थांबवला.

पुन्हा पाच मिनिटांनी खेळायला सुरुवात झाली. या वेळी बाजू बदलली गेली. सहावीचा कर्णधार आपल्या भिडूंना म्हणाला, ''घाबरू नका. कमी गुण मिळाले तरी हरकत नाही; आत्मविश्वासाने खेळा. आपण सातवीला हरवणारच.''

सहावीचा संघ चढाईचा खेळ खेळू लागला. सातवीचा संघ घाई न करता खेळत होता. त्या संघास पहिल्या डावात जे अधिक गुण मिळाले होते, ती सरशी त्यांना टिकवायची होती.

सहावीच्या संघाने मात्र सातवीच्या खेळाडूंना निदान रेषाच ओलांडू द्यायची नाही, असा चंग बांधला होता. रेषा न ओलांडणारा गडी बाद होत असे. ती ओलांडण्याचा जो प्रयत्न करील, त्याला ते जिद्दीने पकडू लागले. त्यांच्या अंगात नुसता जोम संचारला होता! सातवीचा कर्णधार सावंत आणि राहिलेले पाच खेळाडू हे सर्वच्या सर्व बाद झाले. सातवीवर लोण चढले, तेव्हा एकच जल्लोष झाला. आता वेळही फार थोडा होता. दोन्ही संघ अटीतटीने खेळत होते. खेळाची वेळ संपली. पंचांनी शिटी फुंकली. खेळ थांबला. सहावीचा विजय झाला होता. सातवीचा संघ हरला होता; पण दोन्ही संघांच्या कर्णधारांनी एकमेकांना मिठ्या मारल्या. प्रेक्षकांनी टाळ्या वाजवल्या. गुरुजींनी येऊन दोन्ही संघांना शाबासकी दिली. सर्वांची पाठ थोपटली.

सामना किती रंगला होता! भांडण नाही की तंटा नाही; पण खेळात जोश किती! सामना असावा तर असाच!

◆◆◆

## स्वाध्याय

**प्र.१. (अ) कारणे शोधा.**

(१) सुरुवातीलाच सामना रंगायला सुरुवात झाली, कारण...........

(२) 'पाच बाद पाहिजेत पाच !'' असे काही मुले ओरडली, कारण...........

**(आ) खालील वाक्यांतून त्या त्या खेळाडूंचे कोणते गुण दिसतात ते खालील यादीतून शोधून लिहा.**

(१) त्याबरोबर मधल्या भिडूने त्याच्यावर एकदम झडप घालून त्याला पकडले.

(२) सावंतने हां हां म्हणता साखळी तोडली.

(३) सुळे आपल्या संघाकडे सफाईने निघून गेला.

(४) घाबरू नका, कमी गुण मिळाले तरी हरकत नाही.

(५) दोन्ही संघांच्या कर्णधारांनी एकमेकांना मिठ्या मारल्या.

(समयसूचक, आळशी, प्रसंगावधानी, खिलाडूवृत्ती, घाबरट, कुशल, धैर्यशील, विश्वासू)

**प्र.२. जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) मूर्ती लहान पण कीर्ती महान | (अ) सहावीची मुले |
| (२) हाडापेराने मजबूत | (आ) पंच |
| (३) जिंकणारा संघ | (इ) सुळे |
| (४) मध्यंतरासाठी खेळ थांबवणारे | (ई) सावंत |

**प्र.३. (अ) खालील वाक्प्रचार वाचा व त्यांचे अर्थ शोधा. त्या वाक्प्रचारांचा वाक्यांत उपयोग करा.**

(१) हाडपेर मजबूत असणे. (२) निर्धार करणे. (३) धमाल उडणे.

**(आ) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.**

(१) त्यांचा खेळातील दम संपत आला.

(२) कॅप्टनने खेळाडूला इशारा दिला.

(३) क्रीडांगणावर अंतिम सामना पाहण्यासाठी गर्दी जमली होती.

**प्र. ४. स्वमत.**

(१) पाठातील रंगतदार सामन्याचे वर्णन तुमच्या शब्दांत लिहा.

(२) संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकासात खेळाचे असलेले महत्त्व तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(३) 'मी अनुभवलेला चुरशीचा सामना' या विषयांवर आठ ते दहा ओळी लिहा.

## भाषाभ्यास

### २. द्वंद्व समास

GCCG4S

- **खालील उदाहरणे वाचा व अभ्यासा.**

(१) मुलांनी आईवडिलांची आज्ञा पाळावी.

(२) आई गावाहून चार पाच दिवसांत परत येईल.

(३) दूरच्या प्रवासात सोबत अंथरूण पांघरूण घ्यावे.

(१) अधोरेखित शब्दांत किती पदे आहेत?

(२) दोन्ही पदे महत्त्वाची वाटतात काय?

दोन्ही पदे महत्त्वाची — **द्वंद्व समास वैशिष्ट्ये** — समासाचा विग्रह आणि, व, अथवा, किंवा या समुच्चयबोधक उभयान्वयी अव्ययांनी नाहीतर वा, किंवा, अथवा या विकल्पबोधक उभयान्वयी अव्ययांनी करतात.

**द्वंद्व समासाचे तीन उपप्रकार**

| (१) इतरेतर द्वंद्व | (२) वैकल्पिक द्वंद्व | (३) समाहार द्वंद्व |
|---|---|---|
| दोन्ही पदे महत्त्वाची.<br>विग्रह – आणि, व या समुच्च्यबोधक उभयान्वयी अव्ययांनी करावा. | दोन्ही पदे महत्त्वाची.<br>विग्रह वा, किंवा, अथवा अशा विकल्प बोधक उभयान्वयी अव्ययांनी करावा. | दोन्ही पदे महत्त्वाची.<br>दोन्ही पदांसोबत त्याच प्रकारच्या इतर पदांचा समावेश (समाहार) गृहीत धरलेला असतो. |
| उदा., कृष्णार्जुन<br>कृष्ण आणि अर्जुन | उदा., खरेखोटे<br>खरे किंवा खोटे | उदा., भाजीपाला<br>भाजी व इतर गोष्टी |

# ८. दिवे होऊया

**जयंतकुमार त्रिभुवन** (१९४२-२००६) : शिक्षणतज्ज्ञ, लेखक, नाटककार, कवी, दिग्दर्शक, संगीतकार. त्यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान प्रशंसनीय आहे. त्यांची अनेक पुस्तके व लघुकथा प्रसिद्ध आहेत. अनेक नाटकांचे रेडिओवरून सादरीकरण.

दु:खी, पीडित, दुरितांच्या जीवनामध्ये आनंद येण्यासाठी आपण दिवे होऊया व त्यांना तेज-पथाचे यात्री करूया, असा संदेश प्रस्तुत कवितेत कवीने केला आहे.

दिवे उजळता, दिवे होऊया ।
जळता जळता जग उजळूया ।।

डोळे पुसुनि दु:खी जनांचे
त्या अश्रूंच्या ज्योती करूया ।
रात्र जरी अंधारी असली
अंधारा आव्हान देऊया ।।

थरथरणाऱ्या अनेक ज्योती
एक होऊनि मशाल बनूया ।
विश्वातील अवघ्या दुरितांना
तेज-पथाचे यात्री करूया ।।

निरांजनाशी सांगत नाती
अंतर-मंदिरी तेज भरूया ।
तिमिर-बंधने तोडून सारी
चराचराला प्रकाश देऊया ।।



## स्वाध्याय

**प्र. १. (अ) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.**

(१) प्रकाशाची बंधने दूर करूया.
(२) दिवे होऊन जळूया.
(३) निरांजनाशी नाते तोडूया.
(४) अंधाराला आव्हान देऊया.

**(आ) चौकटी पूर्ण करा.**

(१) कवींना बनायचे आहे.
(२) दु:खितांच्या अश्रूंच्या बनवूया–
(३) थरथरणाऱ्या ज्योतींची बनूया –
(४) अंतर–मंदिरी भरूया –
(५) सर्व बंधने तोडून देऊया –

**प्र. २. (अ) कवितेतील ओळी व त्यांचा अर्थ यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| (१) डोळे पुसुनि दु:खी जनांचे. | (अ) अंधाराला दूर करण्याचे आव्हान स्वीकारू. |
| (२) अंधारा आव्हान देऊया. | (ब) प्रकाशमय जीवनरस्त्याचे प्रवासी बनू. |
| (३) तेज–पथाचे यात्री करूया. | (क) प्रत्येकाची मने तेजाने भरवू. |
| (४) अंतर–मंदिरी तेज भरूया. | (ड) अंधकाराच्या आड येणारी बंधने तोडून टाकू. |
| (५) तिमिर–बंधने तोडून सारी. | (फ) दु:खी लोकांचे दु:ख दूर करू. |

**(आ) प्रश्न तयार करा.**

(१) 'मशाल' उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.
(२) 'चराचराला' उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**प्र. ३. खालील शब्दांचे समानार्थी शब्द कवितेतून शोधा.**

(१) अंधार –
(२) जग –
(३) दीप –
(४) रजनी –

**प्र. ४. स्वमत.**

(१) कवीला काय काय करावेसे वाटते? ते कवितेच्या आधारे तुमच्या शब्दांत लिहा.
(२) 'अंधार' आणि 'प्रकाश' या दोन संकल्पनांचा तुम्हांला समजलेला अर्थ सोदाहरण स्पष्ट करा.
(३) 'डोळे पुसुनि दु:खी जनांचे त्या अश्रूंच्या ज्योती करूया।' या ओळीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

**प्र. ५. अभिव्यक्ती.**

कवीप्रमाणे तुम्हांला कोण व्हावेसे वाटते, ते सकारण स्पष्ट करा.

* तक्ता पूर्ण करा.

**बाजूच्या चौकटीतून शब्द किंवा शब्दसमूह योग्य ठिकाणी भरून नंतर उरलेले रकाने भरा.**

| अ.क्र. | सामाजिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (१) | | | |
| (२) | बरेवाईट | बरे किंवा वाईट | वैकल्पिक द्वंद्व |
| (३) | | | |
| (४) | | | |
| (५) | | | |
| (६) | | | |
| (७) | | | |

घडोघडी
बरेवाईट
पाप किंवा पुण्य
प्रतिक्षण
मीठभाकरी
जन्मापासून मरेपर्यंत
दहा किंवा बारा

## भाषाभ्यास

### अलंकार

आपण जेव्हा कथा, कादंबरी, कविता, नाटक वगैरे साहित्य वाचतो, तेव्हा दैनंदिन जगण्यातील भाषेपेक्षा थोडी वेगळी भाषा आपल्याला वाचायला मिळते. आपल्याला साहित्य वाचताना आनंद मिळवून देण्यात त्या भाषेचा मोठा वाटा असतो. दैनंदिन व्यवहारातील भाषेपेक्षा साहित्याची भाषा ज्या घटकांमुळे वेगळी ठरते, त्यांतील एक घटक म्हणजे 'अलंकार'. अलंकार भाषेचे सौंदर्य कसे खुलवतात, हे आपल्याला काही उदाहरणे घेऊन पाहायचे आहे.

**अलंकाराचे मुख्य दोन प्रकार**

(१) **शब्दालंकार**
यमक, अनुप्रास आणि इतर
शब्दांतील अक्षरयोजनेमुळे नाद निर्माण होतो.

(२) **अर्थालंकार**
उपमा, उत्प्रेक्षा, रूपक आणि इतर
योजलेल्या शब्दांमुळे अर्थाचे सौंदर्य निर्माण होते.

आपण काही शब्दालंकारांचा परिचय करून घेणार आहोत.

### १. अनुप्रास अलंकार

* खालील वाक्य वाचा.

'काकूने काकांच्या कपाटातील कामाचे कागद कात्रीने कराकरा कापले.'

हे वाक्य वाचून हसू आले ना? 'क' हा ध्वनी पुन्हा पुन्हा आल्यामुळे वाक्यात ही गंमत निर्माण झाली आहे.

* आता खालील ओळी वाचा.

''गडद निळे गडद निळे
जलद भरून आले.''

या ओळीत ग, ड, द, न, ळ, अशा ध्वनींची पुनरावृत्ती झाली, त्यामुळे कवितेत एक नाद निर्माण झाला. कविता वाचताना आणि ऐकताना त्यातील नादामुळे कविता ऐकण्याचा आनंद मिळतो, अशा वेळी तिथे 'अनुप्रास' अलंकार होतो.

**एखाद्या वाक्यात किंवा कवितेच्या चरणात एकाच अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे जेव्हा त्या वाक्याला वा कवितेला सौंदर्य प्राप्त होते, तेव्हा अनुप्रास हा अलंकार होतो.**

* खालील ओळीत कोणत्या ध्वनींची पुनरावृत्ती झालेली आहे?

''हटातटाने पटा रंगवुनि जटा धरिसी का शिरीं?''

GCLC6F

# ९. संत कबीर

संत कबीर यांचे बालपण, त्यांची स्वभाववैशिष्ट्ये, त्यांचे विचार यांचे वर्णन प्रस्तुत पाठात केलेले आहे.

कितीतरी वर्षांपूर्वीची गोष्ट. उत्तर प्रदेशात वाराणशी नावाचे एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. तेथे नीरू नावाचा एक विणकर राहत असे. तो मोठा कष्टाळू व सदाचारी होता. तो आणि त्याची पत्नी दिवसभर विणकाम करून आपले पोट भरत. शेजाऱ्यापाजाऱ्यांचा त्यांच्यावर फार लोभ होता. त्यांना मूलबाळ नव्हते.

एके दिवशी मोठ्या पहाटे नीरू बाहेर पडला. गावाबाहेर तलाव होता. तेथे तो गेला. इतक्यात त्याला लहान मुलाचे रडणे ऐकू आले. त्या दिशेने तो पुढे गेला. पाहतो तो, तेथे एक लहान मूल रडत पडलेले! त्याने त्याला हळूच उचलले आणि आपल्या छातीशी घेतले. मूल रडायचे थांबले. तो घरी आला आणि पत्नीला म्हणाला, ''बघ, आज सकाळीच आपल्याला देवानं हा प्रसाद दिला.''

''छान आहे मुलगा. मी त्याला माझ्या मुलाप्रमाणंच वागवीन.''

त्यांनी मुलाचे नाव कबीर असे ठेवले. हाच मुलगा पुढे थोर संत झाला. कबीर यांना शाळेतले शिक्षण मिळू शकले नाही. घरी मात्र त्यांना चांगले वळण लागले. देवाची भक्ती ते लहान असतानाच करू लागले. कोणालाही मदत करायला ते तयार असत. सर्वांवरच ते प्रेम करत. कोणाचेही दु:ख ते आपलेच समजत. ते दूर करायला झटत असत. विणकाम तर ते उत्तमच करू लागले.

कबीर जसे मोठे झाले तसे पैसेही मिळवू लागले; पण श्रीमंत होण्यासाठी त्यांची धडपड नव्हती. पोटापुरते मिळवावे व रामाची भक्ती करावी एवढेच त्यांना माहीत होते. विणकाम करतानाही त्यांना रामाचा कधी विसर पडला नाही. रात्रंदिवस त्यांना रामाचाच ध्यास लागलेला. त्यांना आता लोक संत म्हणून ओळखू लागले.

कबीर यांना लिहितावाचता येत नव्हते; पण ते काव्य रचत. विणताविणता त्यांनी कितीतरी पदे व दोहे रचले आहेत. त्यांत देवाची भक्ती आहे. लोकांना चांगले वागण्याचा उपदेश आहे. 'आपण सारी एकाच परमेश्वराची लेकरे आहोत, आपण भेदभाव ठेवू नये, आचरण चांगले ठेवावे, ईश्वरावर श्रद्धा ठेवावी.' असा उपदेश त्यांनी या दोह्यांमधून केला आहे.

कबीर जसे बोलत तसे वागत. ते अत्यंत दयाळू होते. एके दिवशी त्यांनी कापड विणले आणि ते विकण्यासाठी ते घराबाहेर पडले. वाटेत त्यांना एक गरीब भिकारी भेटला. त्याच्या अंगावरील कपड्याच्या नुसत्या चिंध्या झाल्या होत्या. ते पाहून कबीर यांना अत्यंत वाईट वाटले. त्यांना त्या भिकाऱ्याची दया आली. त्यांनी आपल्याजवळच्या कापडापैकी निम्मे कापड त्या भिकाऱ्यास देऊन टाकले. तेव्हा तो भिकारी म्हणाला, ''महाराज, एवढंसं कापड मला कसं पुरणार?'' हे ऐकून कबीर यांनी उरलेले कापडही त्या भिकाऱ्याला देऊन टाकले! बाजारात कापड विकायला गेलेले कबीर रिकाम्या हातानेच घरी परतले; पण परतताना त्यांना किती समाधान वाटत होते!

एकदा ते गंगेच्या तीरावर गेले. तेथे एक मठ होता. कबीर त्या मठात गेले. तेथे एक स्त्री बैराग्यांच्या भिक्षापात्रांत दूध वाढत होती. कबीर यांनाही एका पात्रात दूध दिले. सर्व बैराग्यांनी दूध पिऊन आपापली पात्रे रिकामी केली; कबीर यांचे पात्र जसेच्या तसे काठोकाठ भरलेले होते! ते पाहून तिने कबीर यांना

विचारले, ''महाराज, आपण दूध का घेतलं नाही?''


त्यावर कबीर म्हणाले, ''तो पाहा, मठाबाहेर एक आंधळा बसला आहे. उपाशी आहे तो. त्याला या दुधाची अधिक गरज आहे. साधू काय आणि आंधळा काय, राम काय, रहीम काय, सारे एकच आहेत. आपण सारे एकाच ईश्वराची लेकरे आहोत.''

'भाव तेथेच देव असतो. आपण मनापासून भक्ती केली तर ईश्वर प्रसन्न होतो. चांगले काम हाती घ्यावे व ते उत्तम प्रकारे करावे. सर्वांवर प्रेम करावे. खरे बोलावे.' असे ते नेहमी म्हणत.

◆◆◆

## स्वाध्याय

**प्र. १. (अ) खालील चौकटी पूर्ण करा.**




**(आ) योग्य पर्याय लिहून रिकाम्या जागा भरा.**

(अ) कबीर यांचे ................... प्रसिद्ध आहेत. (अभंग/भारूडे/दोहे/ओव्या)


(आ) कबीर जसे बोलत तसे ................... .(चालत/बोलत/वागत/गात)

(इ) व्यवसाय म्हणून कबीर ................... करत. (विणकाम/भरतकाम/बागकाम/शिवणकाम)


(ई) कबीर यांच्या मते भाव तेथे................... .(भक्ती/देव/धन/पैसा)

**प्र. २. आकृती पूर्ण करा.**

(अ)




(आ)



**प्र. ३. रिकाम्या जागा भरा.**

(अ) उत्तर प्रदेशातील तीर्थक्षेत्र – 

(आ) बालपणी कबीर यांचा सांभाळ करणारे – 

**प्र. ४. (अ) योग्य जोड्या लावा.**

| विरामचिन्हे | विरामचिन्हाचे नाव |
|---|---|
| . | एकेरी अवतरण |
| ; | प्रश्नचिन्ह |
| ! | पूर्णविराम |
| ? | उद्‌गारवाचक चिन्ह |
| ‘ ’ | अर्धविराम |

**(आ) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांची जात ओळखा.**

(१) एकदा <u>ते</u> <u>गंगेच्या</u> <u>तीरावर</u> <u>गेले</u>.

ते –  तीर –  गंगा –  वर – 

(२) <u>कबीर</u> त्या <u>मठात</u> <u>गेले</u>.

कबीर –  मठ –  गेले – 

**प्र. ५. स्वमत.**

(१) संत कबीर यांच्या स्वभावाविषयी तुमचे मत लिहा.

(२) संत कबीर यांच्या जडण-घडणीत असलेले बालपणीच्या संस्कारांचे महत्व लिहा.

(३) ‘संत कबीर दानशूर होते’, हे विधान तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

## भाषाभ्यास

### २. यमक अलंकार

**✻ खालील ओळी वाचा.**

‘‘अनाथांचा नाथ । कृपावंत देवा ।।
घडो तुमची सेवा । अहर्निशी ।।’’

या ओळी तुम्ही वाचल्या आहेत. या ओळीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या चरणाच्या शेवटी ‘वा’ हे अक्षर आले आहे. त्यामुळे या कवितेत नाद निर्माण झाला आहे. अशा वेळी तेथे यमक हा अलंकार होतो.

**कवितेच्या चरणाच्या शेवटी, मध्ये किंवा ठरावीक ठिकाणी एखाद्या अक्षराची पुनरावृत्ती झाल्यास कवितेत नाद निर्माण होतो, तेव्हा तेथे यमक अलंकार होतो.**

**✻ खालील ओळींमध्ये कोणत्या अक्षरांचे यमक आढळते?**

(१) ‘‘ही वाट दूर जाते स्वप्नामधील गावा,
माझ्या मनातला का तेथे असेल रावा.’’

(२) हिंदू ओढे, धुंदू ओहळ
झाडावरचे काढू मोहळ

# १०. जडण-घडण

**किशोरी आमोणकर** (१९३१-२०१७) : शास्त्रीय संगीतातील प्रसिद्ध गायिका. त्यांच्या संगीताचे अनेक कार्यक्रम परदेशातही लोकप्रिय झाले आहेत. महाराष्ट्र शासनाचा 'महाराष्ट्र गौरव', प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाचा 'कलाशिरोमणी' इत्यादी अनेक पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत. भारत सरकारने 'पद्‍मभूषण' पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला आहे.

गाणे हे व्रत आहे. ते व्रतस्थपणे जपून परिश्रमपूर्वक साधना केल्यास गाणे आत्मसात होऊ शकते, हे या पाठात सांगितले आहे.

बालपणीचा काळ मला महत्त्वाचा वाटतो, तो त्या वेळी झालेल्या संस्कारांमुळे ! माझी सारी जडण-घडण त्या वेळी झाली. माझ्या आईने त्या वेळी माझ्यावर जे संस्कार केले, त्यामुळे मी गायिका झाले; पण त्याचबरोबर एक व्यक्ती म्हणूनही चांगले जीवन जगण्याची दिशा मला मिळाली. संगीताला जीवनात परमेश्वर मानून व्रतस्थपणे जपण्याची भाविकता आईने दिली.

कुर्डू हे आमचे मूळ गाव; पण आई ते सोडून केव्हाच मुंबईत स्थायिक झालेली होती. त्यामुळे माझा जन्म मुंबईत झाला. आम्ही तीन भावंडे. मी सर्वांत थोरली. त्यानंतर एक बहीण नि सर्वांत धाकटा एक भाऊ. मी सहा वर्षांची असतानाच वडील निवर्तले. त्यामुळे आमचा सांभाळ, शिक्षण वगैरे सगळे आईनेच केले. माझे शिक्षण अर्थातच मुंबईत झाले.

माझी आई प्रख्यात गायिका. तिला आम्ही माई म्हणत असू. त्या वेळी उस्ताद अल्लादियाँ खाँसाहेबांची प्रतिभावंत शिष्या म्हणून मोगूबाई कुर्डीकर या नावाला आगळीच प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. माझ्यावर गाण्याचे संस्कार तिच्यामुळेच झाले. त्याचबरोबर वत्सल, आदर्श आई म्हणूनही तिने माझ्या जीवनात एक वेगळे स्थान निर्माण केले.

वडील निवर्तल्यावर घरची परिस्थिती बिकट बनली, तरी माई खचली नाही. ती मूळचीच धीराची, मोठ्या जिद्‍दीची. परिस्थितीला शरण न जाता तिने स्वत: काम करायला सुरुवात केली; कारण आपल्या मुलांनी आयुष्यात स्वतंत्रपणे काहीतरी मिळवले पाहिजे, हा तिचा ध्यास होता. दिवसभर कष्ट करून शिवाय ती गाणे जपत होती. गाणे हे तिचे व्रत होते. ते ती व्रतस्थपणानेच जोपासत होती. या साऱ्या गोष्टींचे संस्कार आपोआप माझ्यावर होत होते.

घरातले वातावरण धार्मिक होते. पुस्तकेही धार्मिकच असायची. वाटेल ती पुस्तके सरसकट घरी येत नसत. काय वाचावे, कसे वाचावे याची शिस्तही माईने लावली. गीता, तिचे मराठी भाषांतर, ज्ञानेश्वरी हे सारे त्यामुळे लहानपणीच वाचून झाले.

मला सगळी कामे करता आली पाहिजेत, यावर तिचा कटाक्ष असायचा. अभ्यासाच्या बरोबरीने तिने घरकाम शिकवले. स्वयंपाक करणे, पाट्यावर वाटणे, धान्य कांडणे, रांगोळ्या काढणे अशा कितीतरी गोष्टी त्यातून मी शिकले आणि ही सगळी कामं व्यवस्थितच झाली पाहिजेत असा तिचा आग्रह असायचा. धान्य कांडताना मुसळ वाजता कामा नये. त्याचा इतरांना त्रास होतो, असे ती सांगायची. मी काम करताना तिचे बारीक लक्ष असायचे, त्यामुळे आपोआपच काम व्यवस्थित केले जायचे. स्वयंशिस्तीची ही जाणीव माईने करून दिली. आजतागायत ती माझ्या मनात जागी आहे.

वयाच्या दहाव्या वर्षी आईने मला गाणे शिकवणे सुरू केले. त्या बाबतीतही ती विलक्षण जागरूक



होती. काहीही शिकताना तुम्ही एकाग्रतेने ते ऐकले पाहिजे, पूर्ण लक्ष त्यावर केंद्रित केले पाहिजे हा तिचा मुख्य दंडक असायचा. ती स्वत: शिकवायला बसली, की एक तान जास्तीत जास्त दोन वेळा म्हणून दाखवायची. तिसऱ्यांदा तुम्हांला त्यातले थोडेतरी म्हणता आलेच पाहिजे. तसे जमले नाही किंवा ''पुन्हा म्हणतेस का माई?'' असे हळूच विचारले, तरी ती करड्या स्वरात म्हणायची, ''कुठे होतं लक्ष?'' नाहीतर मग कधीकधी खूप चिडायची अन् पुढच्या क्षणी तिथून उठून निघून जायची. तिच्या या रागावण्याची मला फार भीती वाटायची. त्यामुळे रियाजाला बसले, की माझे सारे लक्ष फक्त आणि फक्त माईच्या स्वरांकडे असायचे.

गाणे शिकणाऱ्याने अनेक गायकांचे गाणे सतत ऐकले पाहिजे; पण कुणाचे गाणे ऐकावे याबाबतही माई दक्ष असायची. वाटेल ते गाण्याचे कार्यक्रम ऐकायला तिने कधी मला जाऊ दिले नाही. संध्याकाळी एखादा कार्यक्रम असला आणि त्याला जाण्यासाठी मी हट्ट धरला की माई विचारायची, ''गृहपाठ झाला का करून?''

डोळे चोळत चोळत मी उठायची. माझे बेळगावचे मामा कधीकधी आमच्याकडे राहायला यायचे. पहाटे उठल्यावर डोळ्यांवरची झोप जावी म्हणून गरमागरम चहाचा कप देऊन ते बैठकीवर माझ्या बाजूला बसून राहायचे. माईच्या भीतीने झोप कुठल्या कुठे उडायची. स्वर आपोआप जुळायचे. इतक्या पहाटेही माईचे गाण्याकडे बारीक लक्ष असायचे. एखादा स्वर चुकला तरी ती चटकन सांगायची. एखादी तान गाऊन दाखवायची नि सांगायची, ''म्हण आता ही तान एकशे आठ वेळा.''

ती तान घटवता घटवता माझ्या नाकी दम यायचा; पण एकशेआठ वेळा गाऊन झाल्याशिवाय सुटका नसायची. तोपर्यंत ती तान जमायला लागायची. कधी संध्याकाळी असा रियाज सुरू असताना काही चूक झाली, की माई म्हणायची, ''बरोबर गाता आल्याशिवाय जेवण नाही मिळणार रात्री.'' माईच्या या कडक शिस्तीमुळे मला चांगले वळण लागले. मेहनत करायची सवय लागली. संगीत साधनेतील माईची तन्मयता; गुरूने दिलेली विद्या जपण्यासाठी, वाढवण्यासाठी तिने केलेले जिवापाड प्रयत्न, केवळ शास्त्रीय संगीत गाण्याची तिची निष्ठा या साऱ्या गोष्टींचा माझ्या मनावर पहिल्यापासून खोलवर परिणाम झाला. आपले गाणे आपल्या आईच्या नावाला, कीर्तीला साजेसे झाले पाहिजे, यासाठी आटोकाट परिश्रम करण्याचा ध्यास मला तेव्हापासून लागला.

जे करायचे ते सारे अत्यंत विनम्रपणे केले पाहिजे ही तिची आणखी एक मुख्य शिकवण. जरासाही अहंकार तिला सहन व्हायचा नाही. मला आठवते, मुंबईतील जहांगीर आर्ट गॅलरी नव्यानेच खुली झाली

होती. त्या वेळी माईचे गाणे होणार होते. तानपुऱ्यावर साथीला मी बसले होते. सारे श्रोते कुतूहलाने आम्हां मायलेकींकडे बघत होते. मीही औत्सुक्याने ते न्याहाळत असल्याने तानपुरा नीट लागला नाही. तिथेच माई म्हणाली, ''येत नसेल तर ऊठ नि उतर खाली!'' तिचा चिडका स्वर ऐकताच माझे लक्ष आपोआप तानपुऱ्यावर स्थिरावले. अहंकार नाहीसा करणे माईला सहज जमायचे; त्यामुळेच मी या दुर्गुणापासून दूर राहू शकले. परिश्रमांनी गाणे वाढवू शकले. मला वाटते माझ्या जीवनाची, जडण-घडणीची खरी शिल्पकार माईच आहे.

◆◆◆

## स्वाध्याय

**प्र. १. (अ) खालील आकृती पूर्ण करा.**

मोगूबाई कुर्डीकर यांचे गुण.

**(आ) खालील चौकटी पूर्ण करा.**

(१) लेखिकेच्या आईचे नाव -
(२) लेखिकेच्या आईचे गुरू -
(३) लेखिकेने बालपणी वाचलेले ग्रंथ -
(४) लेखिकेच्या जडण-घडणीची शिल्पकार -

**प्र. २. (अ) खालील आकृती पूर्ण करा.**

लेखिकेच्या आईने लेखिकेला शिकवलेल्या घरकामाच्या गोष्टी

**प्र. ३. खालील शब्द योग्य ठिकाणी भरून वाक्ये पूर्ण करा.**

(तन्मयता, जडण-घडण, रियाज, व्रतस्थपणे, प्रतिभावंत)

(१) माझी .................. माझ्या आईने केली.
(२) गाण्याचा .................. करायला बसले की एकाग्रता हवीच.
(३) गाणे हे व्रत माई .................. जपत होत्या.
(४) मोगूबाई कुर्डीकर .................. गायिका होत्या.
(५) गाण्यातली .................. गाण्याची गुणवत्ता वाढवते.

**प्र. ४. (अ) खालील वाक्प्रचारांचे योग्य अर्थ शोधा.**

(अ) नाकी दम येणे-

(१) खूप कंटाळा येणे.

(२) खूप थकून जाणे.

(३) खूप दम लागणे.

(आ) आटोकाट प्रयत्न करणे -

(१) प्रयत्न करणे.

(२) खूप प्रयत्नाने थकणे.

(३) कसून प्रयत्न करणे.

**(आ) खालील वाक्यांतील चुकीची विरामचिन्हे बदलून योग्य विरामचिन्हे वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

(१) ती करड्या स्वरात म्हणायची : कुठे होतं लक्ष!'

(२) काय वाचावे, कसे वाचावे याची शिस्तही माईने लावली.

(३) स्वयंपाक करणे. पाट्यावर वाटणे. धान्य कांडणे अशा कितीतरी गोष्टी मी शिकले?

**प्र. ५. स्वमत.**

(१) 'बालपणीचा काळ लेखिकेला महत्त्वाचा वाटतो.' या विधानाचा अर्थ तुमच्या शब्दांत लिहा.

(२) गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक आलेल्या तुमच्या मित्राची मुलाखत घेण्यासाठी प्रश्न तयार करा.

**प्र. ६. अभिव्यक्ती.**

(१) माईची शिस्त कडक होती, हे दाखवणारे पाठात आलेले प्रसंग तुमच्या शब्दांत लिहा.

(२) तुमच्या आईच्या शिस्तप्रियतेचा तुम्हांला आलेला अनुभव वर्णन करा.

**भाषा सौंदर्य**

**एकच भाव वेगवेगळ्या प्रकारांनी व्यक्त करणे-**

एखादे रिकामे घर पाहिल्यावर तुमच्या मनात येणारे विचार.

(१) घर उदास वाटते.

(२) घर कुणाची तरी आठवण काढते.

(३) घर स्वत:चे एकेकाळचे वैभव आठवून उदास झाले आहे.

(४) घराला गाव सोडून गेलेल्या माणसांची आठवण येते.

(५) एकेकाळी माणसांनी भरलेले घर आज एकाकी वाटते.

विद्यार्थ्यांनो, ही यादी कितीही वाढवता येईल. भाषेच्या अशा अर्थपूर्ण आणि सृजनशील रचनांचा अभ्यास करा व आपले लेखन अधिक परिणामकारक करा.

G05490

# ११. लेझीम

**श्री. बा. रानडे** (१८९२-१९८४) : प्रसिद्‌ध कवी. 'श्री-मनोरमा' काव्यसंग्रह; 'दिवाळीची डाली' हे प्रहसन; 'काळाच्या दाढेतून' हे खंडकाव्य; 'कुंपणावरून' हे छायानाट्य प्रसिद्‌ध.

सुगीच्या दिवसांत शेतामधील धान्याच्या राशी पाहून शेतकऱ्यांची मने प्रफुल्लित होतात आणि तो आनंद लेझीम खेळून शेतकरी व्यक्त करतात. त्या आनंदमय वातावरणाचे वर्णन प्रस्तुत कवितेत कवीने केलेले आहे.

दिवस सुगीचे सुरू जाहले
ओला चारा, बैल माजले
शेतकरी-मन प्रफुल्ल झाले
छन् खळ् खळ् छन्
ढुम् ढुम् पट ढुम्
लेझिम चाले जोरात!

दिवटी फुरफुर करू लागली
पटक्यांची वर टोके डुलली
रांग खेळण्या सज्ज जाहली
छन् खळ् खळ् छन्
ढुम् ढुम् पट ढुम्
लेझिम चाले जोरात!



भरभर डफ तो बोले घुमुनी
लेझिम चाले मंडल धरुनी
बाजुस, मागे, पुढे वाकुनी
छन् खळ् खळ् छन्
ढुम् ढुम् पट ढुम्
लेझिम चाले जोरात!

पहाट झाली, तारा थकल्या,
मावळतीला चंद्र उतरला
परी न थकला लेझिम-मेळा
छन् खळ् खळ् छन्
ढुम् ढुम् पट ढुम्
लेझिम चाले जोरात!

## स्वाध्याय

**प्र. १. (अ) कारणे लिहा.**

शेतकऱ्याचे मन प्रसन्न झाले, कारण.....

**(आ) आकृती पूर्ण करा.**

लेझीम खेळणाऱ्यांची तयारी

**प्र.२. लेझीमचा मेळा किती वेळ खेळत होता?**

**प्र.३. कवितेतील खालील ओळींचा तुम्हांला समजलेला सरळ अर्थ लिहा.**

| ओळ | सरळ अर्थ |
|---|---|
| (१) दिवस सुगीचे सुरू जाहले. | |
| (२) लेझीम चाले मंडल धरुनि. | |
| (३) मावळतीला चंद्र उतरला. | |

**प्र.४. (अ) खालील शब्द व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) दिवटी | आनंदी |
| (२) मंडल | छोटी मशाल |
| (३) प्रफुल्ल | तयार |
| (४) सज्ज | गोल |

**(आ) खालील शब्दांचे लिंग ओळखा.**

(१) पहाट–

(२) डफ–

(३) मेळा–

(४) सुगी–

**प्र.५. स्वमत.**

(१) लेझीम 'जोरात' चालण्याची तुम्हांला समजलेली कारणे लिहा.

(२) प्रफुल्लित झालेल्या शेतकऱ्याचे तुमच्या शब्दांत वर्णन करा.

**प्र.६. अभिव्यक्ती.**

सुगीच्या दिवसांतील शेताचे सौंदर्य तुमच्या शब्दांत वर्णन करा.

# १२. अबूखाँची बकरी

**डॉ. झाकीर हुसेन** (१८९७-१९६९ ): भारताचे तिसरे राष्ट्रपती व ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ. अर्थशास्त्र या विषयात पीएच.डी. स्फटिकांचा व चित्रविचित्र खड्यांचा संग्रह करणे, हा त्यांचा आवडता छंद होता. ते ग्रंथप्रेमी होते. जर्मन भाषेमध्ये त्यांनी महात्मा गांधी यांचे चरित्र लिहिले असून 'द डायनॅमिक युनिव्हर्सिटी' या नावाने त्यांची व्याख्याने प्रसिद्‌ध आहेत.

स्वातंत्र्याचे मोल प्राणापेक्षाही मोठे असते, हे बकरीच्या कथेतून सांगत स्वातंत्र्याचे महत्त्व प्रस्तुत पाठातून लेखकाने व्यक्त केले आहे.

हिमालयाच्या पायथ्याशी वसलेले 'अलमोरा' हे लहानसे खेडेगाव. तिथे अबूखाँ नावाचा एक म्हातारा गृहस्थ राहत होता. तो एकटाच असल्यामुळे नेहमीच एक-दोन बकऱ्या पाळायचा. त्यांच्यावर जीवापलीकडे प्रेम करायचा. बकऱ्या म्हणजे त्याचा जीव की प्राण ! बकऱ्या जणू त्याची अपत्ये ! तो त्यांचा पिता !

अबूखाँने आपल्या बकऱ्यांना कल्लू, मंगलिया, गोणारी, हुकुमा अशी गमतीची नावे दिली होती. त्यांच्यात अबूखाँचा सारा दिवस जाई. तो त्यांना खाऊपिऊ घाली, त्यांच्याशी बोले, त्यांना गोष्टी सांगे. त्यांच्यासोबत दऱ्याखोऱ्यांतून, रानावनांतून, शेतांतून हिंडे-फिरे. संध्याकाळ होऊ लागली, की तो सर्व बकऱ्यांना घरी आणी. सोप्यात बांधी. खाऊपिऊ घाली. रात्रीच्या वेळी कुठे बाहेर जाऊ नयेत, म्हणून डोळ्यांत तेल घालून तो त्यांना जपत असे. त्या डोंगरात एक क्रूर लांडगा वावरत होता. बकरी दिसली रे दिसली, की तो झडप घाली, मारून टाकी व खाऊन फस्त करी, म्हणून अबूखाँ आपल्या लाडक्या बकऱ्यांना खूप जपायचा.

अबूखाँने कितीही चांगले खाऊपिऊ घातले, जीव लावला, काळजी घेतली, तरी बकऱ्या मात्र संधी मिळेल, तेव्हा डोंगरावर चरायला जात. अबूखाँची उत्तम बडदास्त किंवा लांडग्यांचे भय त्यांना डोंगरात चरायला जाण्यापासून कधीही परावृत्त करू शकले नाही. दरीत गेल्यावर त्या परत येण्याचा प्रयत्न करत नसत. डोंगरदऱ्यांतून मनसोक्त हिंडायचे, मनमुराद चरायचे, मोकळेपणाने हुंदडायचे, खेळायचे, बागडायचे. हे स्वातंत्र्य अन् मोकळेपणा, जन्मजात असलेली साहसी वृत्ती यांमुळेच त्यांना अबूखाँच्या बंदिस्त आणि शांत घरापेक्षा दऱ्याखोऱ्यांतील धोक्याचे जीवन अधिक आवडत असे, यात नवल काय ?

अबूखाँला मात्र याचे नवल वाटायचे. दुःख सलायचे. त्याला बकऱ्यांच्या वागण्याचे कोडे उलगडायचे नाही. 'मी एवढे हिरवेहिरवे, लुसलुशीत गवत देतो, शेतातले धान्य देतो, घरी दाणापाणी करतो, एवढे करूनही माझ्याजवळ त्या राहत नाहीत, डोंगरात जातात. लांडग्याची शिकार होतात. जीव गमावून बसतात.' अबूखाँ मनातल्या मनात हळहळायचा. त्याचे डोळे ओलेचिंब व्हायचे.

शेवटी त्याने ठरवले, की यापुढे बकरी पाळायचीच नाही. काही दिवस असेच गेले; परंतु त्याला बकरीवाचून करमेना, अन्नही जाईना. अखेर त्याचा निश्चय ढळला आणि एक दिवस त्याने एक छोटीशी बकरी आणली. ती फार सुंदर होती. बर्फासारखी पांढरीशुभ्र, अंगावर मऊमऊ केस, टोकदार शिंगे, लालचुटूक डोळे, अबूखाँचा तिच्यावर जीव जडला. तिचे त्याने आवडीने नाव ठेवले 'चांदणी'. आकाश उजळून काढणारी पांढरीशुभ्र चांदणी असते, तसे अबूखाँचे आयुष्य उजळून प्रसन्न करणारी ही बकरी 'चांदणी'.

अबूखाँने विचार केला, हिला खूप खाऊपिऊ घालू, खूपखूप जीव लावू. डोंगरात जायचा विचारही हिच्या मनात यायला नको. त्यामुळे अबूखाँ तिला नेहमी सोबतच ठेवू लागला. तिचा दोरही लांब लांब ठेवला. तिला मोकळेपणाने हिंडता येईल. मनसोक्त चरता येईल. घर तुरुंग वाटणार नाही. धोका नको म्हणून

घराभोवती चांगले मजबूत बांबूचे कुंपणही घालून घेतले. चांदणीही तिथे रमली. अबूखाँलाही आपले प्रयत्न सफल झाल्याचे समाधान मिळाले. त्याला वाटले चांदणी आता आपल्याला कधी सोडून जाणार नाही. ती इथे रमली.

एकदा चांदणीने समोर बघितले. वा ! पर्वताची शिखरे किती सुंदर ! तिथे जाऊन उड्या मारण्यात, नाचण्यात काय गंमत असेल ! छे, छे, आपण काय या बंधनात पडलो ! चार भिंतींचा तुरुंग, दोराचे बंधन, केवढे हे दुर्दैव ! आपल्याला डोंगरच हवा. मुक्त हवा हवी. मनसोक्त हुंदडायला हवे. तोच जिवाचा आनंद.

झाले, तिचे वागणेच बदलले. अबूखाँचे गवत आवडेनासे झाले. त्याच्या हातच्या पाण्यातला गोडवा हरवला. त्याच्या गोष्टींत मन रमेना. ती सारखी त्या डोंगराकडे बघत बसे. तिचे दुःख अबूखाँला जाणवले. तो तिची अधिकाधिक काळजी घेऊ लागला. बडदास्त ठेवू लागला. अबूखाँने लांडग्याचे भय दाखवले, तेव्हा चांदणीने आपली दोन शिंगे दाखवली. जणू ती सांगत होती, की शिंगांनी त्याचा मुकाबला करीन. लढत देईन. हा तिचा निर्धार अबूखाँने ओळखला. त्याने तिला लांडग्याचा धाक दाखवला. त्याने मारलेल्या बकऱ्यांच्या कथा ऐकवल्या. ती सुरक्षित राहावी, म्हणून तिला खोलीत कोंडून कुलूप घातले. हे करताना खिडकीकडे त्याचे लक्ष राहिले नाही. चांदणी त्याच खिडकीतून उडी घेऊन आपले सारे बळ एकवटून पळाली.

डोंगर जणू दोन्ही हात पसरून तिचे स्वागत करत होता. मोकळा थंडगार वारा तिला कुरवाळत होता. इथे चार भिंती नाहीत, कुंपण नाही, दोराचे बंधन नाही, नजरेचा पहारा नाही, सारे कसे मुक्त. मोकळे.



आनंदी. मनाला हवेसे वाटत असते तसे ! चांदणी त्या वातावरणात हरवून गेली. नाचली, खेळली, हुंदडली, गायली. दुपार झाली. मेंढ्या-बकऱ्यांचे कळप आले, गेले. मेंढपाळाने हाकलत नेले. चांदणीला असा कुठलाच कळप वा बंधन आता नको होते. हा मोकळेपणाच तिला लाखमोलाचा होता.

हळूहळू अंधार पडू लागला. दरीतून अबूखाँची तिला बोलवणारी शीळ आली. चांदणीने तो मोह टाळला. रात्र झाली. झुडपातून गुर्रगुर्र आवाज पुन्हा पुन्हा आला. दोन खुनशी डोळे चकाकू लागले. चांदणीला लांडग्याचे स्मरण झाले. त्याच्याशी प्राणपणाने झुंज देत आपला जीव गमावणाऱ्या बकऱ्यांच्या कथा आठवल्या. 'आपण भेकड नाही. शूर आहोत. आपल्यातही बळ आहे. शिंगे आहेत. झुंज द्यायला हवी. जयपराजय काय होईल ते होवो, सर्वस्व पणाला लावू.' असे तिने ठरवले.

लांडगा झडप घालायला आला. चांदणी सामोरी गेली. तिचा त्वेष व धैर्य पाहता ती वाघीणच दिसू लागली. दोघांची लढत लागली. ती खूप वेळ चालली. रात्र सरत होती. चांदणी सूर्योदयाची वाट पाहू लागली. शेवटी कोंबडा आरवला. चांदणी रक्तबंबाळ होऊन पडली. झाडावरील पक्षी हे सारे पाहत होते. त्यांच्यात चर्चा सुरू झाली. कोण जिंकले ? बहुतेकांना लांडगा जिंकला असे वाटले. एक शहाणा पक्षी म्हणाला, ''नाही. ही झुंज चांदणीने जिंकली.''

◆◆◆

## स्वाध्याय

**प्र. १. खालील चौकटी पूर्ण करा.**

(अ) अबूखाँचे गाव ☐

(आ) अबूखाँचे बकऱ्या बांधण्याचे ठिकाण ☐

(इ) अबूखाँ बकरीला खाऊ घालत त्या गवताची वैशिष्ट्ये ☐ ☐

(ई) अबूखाँच्या नवीन बकरीचे नाव ☐

**प्र. २. खालील आकृती पूर्ण करा.**

(अ) **छोट्या बकरीसाठी अबूखाँने केलेल्या सोई**

☐ ☐ ☐ ☐

(आ) **चांदणीचा स्वातंत्र्याचा आनंद**

☐ ☐ ☐

**प्र. ३. कारणे लिहा.**

(अ) अबूखाँच्या गोष्टीत चांदणीचे मन रमेना, कारण......

(आ) चांदणीने अबूखाँला दोन शिंगे दाखवली, कारण........

(इ) चांदणी खिडकीतून उडी घेऊन पळाली, कारण...

**प्र. ४. उत्तरे लिहा.**

(अ) बकऱ्या म्हणजे जणू त्यांची ☐

(आ) डोंगराने चांदणीचे केलेले स्वागत ☐

(इ) तिचा त्वेष व धैर्य पाहता ती भासली ☐


**प्र. ५. स्वमत.**

चांदणी आणि लांडगा यांच्यातील लढतीचे तुमच्या शब्दांत वर्णन करा.

# १३. शांतीगीत

**हाशम पटेल** (१९५२) : उत्तम वक्ते, कवी. सृष्टिसौंदर्याकडे संवेदनशील वृत्तीने बघणारे कवी. चिंतनशील व अभिजात रसिकता ही लेखन वैशिष्ट्ये. विविध नियतकालिकांमधून लेखन. 'संग्राम' हा कवितासंग्रह प्रसिद्ध.

जग हे सुंदर आहे. हे सुंदर जग बघण्यासाठी मनुष्याच्या अंगी असणारा आळस व विकृती झटकून, विज्ञानाची कास धरून क्षितिजाच्या पलीकडे झेप घेण्याची इच्छा प्रस्तुत कवितेतून कवी व्यक्त करत आहे.



क्षितिजाच्या पलीकडे झेपू चला चला रे
जग सारे सुंदर तिथे पाहू चला चला रे
मुक्त होऊ बंधनातुनी
जागे होऊ झोपेतूनी
टाकून देऊ आळसाला
जाळून टाकू रे विकृतीला
क्षितिजाच्या पलीकडे झेपू चला चला रे
जग सारे सुंदर तिथे पाहू चला चला रे ।।१।।

पुढे गेले सारे सोबती
मागे राहिलो आम्ही मंदगती
आता उड्डाण करु यानगती
क्षणात अवकाशात रे
क्षितिजाच्या पलीकडे झेपू चला चला रे
जग सारे सुंदर तिथे पाहू चला चला रे ।।२।।

विज्ञानाच्या दृष्टीने
अध्यात्माच्या शक्तीने
दाही दिशांत दुमदुमू
शांतीचे गीत रे
क्षितिजाच्या पलीकडे झेपू चला चला रे
जग सारे सुंदर तिथे पाहू चला चला रे ।।३।।

## स्वाध्याय

**प्र. १. कोठे ते लिहून चौकट पूर्ण करा.**

(१) सारे सुंदर जग पाहावे [ ]

(२) यानगतीने उड्डाण करावे [ ]

**प्र. २. (अ) योग्य पर्याय लिहा.**

(१) दाही दिशांत दुमदुमू ········· गीत रे.

(भक्तीचे / शांतीचे / स्वातंत्र्याचे)

**(आ) खालील शब्दांना कवितेतील शब्द शोधा.**

(१) सवंगडी – [ ]

(२) निद्रा – [ ]

(३) विश्व – [ ]

(४) सगळे – [ ]

**प्र. ३. स्वमत.**

(१) प्रस्तुत कवितेत कवीचे म्हणणे तुमच्या शब्दांत लिहा.

(२) 'दाही दिशांत शांतीचे गीत दुमदुमले' या ओळीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

(३) 'विज्ञान आणि अध्यात्म यांच्या समन्वयाने शांती नांदेल', या वाक्यातून व्यक्त झालेल्या विचारांविषयी तुमचे मत लिहा.

## भाषाभ्यास

### विरामचिन्हे

**✻ खालील वाक्ये वाचा व अभ्यासा.**

(१) आवडले का तुला हे पुस्तक

(२) जया म्हणाली हो जेवणानंतर मी सर्व गोष्टी वाचणार आहे

(३) वडील म्हणाले ज्ञानेश्वरी कुणी लिहिली तुला ठाऊक आहे का

वरील संवाद वाचताना वाक्य कुठे संपते, प्रश्न आहे की उद्गार आहे, हे काहीच कळत नाही कारण या वाक्यात विरामचिन्हे नाहीत. बोलताना, काही विधाने करताना, प्रश्न विचारताना, आश्चर्य, हर्ष, क्रोध आदी भावना व्यक्त करताना माणूस त्या त्या ठिकाणी कमी-अधिक वेळ थांबतो, म्हणून तोच आशय लिहून दाखवताना वाचकालाही कळावा, यासाठी विरामचिन्हांचा वापर केला जातो.

**✻ वरील वाक्यांत योग्य विरामचिन्हे वापरा. विरामचिन्हे व त्यांची नावे खालील तक्त्यात लिहा.**

| विरामचिन्हे | नावे |
|---|---|
| | |
| | |
| | |

# १४. दिव्य

**जयंत नारळीकर** (१९३८) : प्रसिद्‌ध खगोलशास्त्रज्ञ, विज्ञानकथा लेखक, कादंबरीकार. मराठी साहित्यातील त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान म्हणजे त्यांच्या विज्ञानकथा. 'यक्षांची देणगी' हा विज्ञानकथा संग्रह; 'प्रेषित', 'वामन परत न आला', 'व्हायरस' या विज्ञान कादंबऱ्या; 'विज्ञान आणि वैज्ञानिक', 'गणितातल्या गमतीजमती', 'आकाशाशी जुळले नाते' इत्यादी पुस्तके प्रसिद्‌ध. भारत सरकारकडून पद्‌मभूषण पुरस्काराने सन्मानित.

आलोकच्या अंगी असणारी चतुराई प्रस्तुत पाठातून लेखकाने वर्णिली आहे.

एकविसाव्या शतकाच्या मध्यावर घडणारी ही कथा आहे, आलोक नाईक नावाच्या विलक्षण बुद्‌धिमान मुलाची. अंतराळातल्या वसाहतींमध्ये राहून काम करण्यासाठी जगातल्या निवडक बुद्‌धिमान मुलामुलींना विशेष शाळांमध्ये प्रशिक्षणासाठी पाठवण्यात येई. भारतातर्फे एके वर्षी आलोकची निवड झाली आणि तो सिंगापूरच्या शाळेमध्ये दाखल झाला. हुआन चेंग हा चिनी विद्यार्थीही त्याच शाळेत होता.

ज्या परिस्थितीत चेंगची आलोकशी दोस्ती झाली ती 'अद्‌भुत' या सदरात मोडेल. ''नवीन विद्यार्थ्याला आत आणा,'' चेंगने आज्ञा केली. तो एका लांब टेबलाच्या मध्यभागी राजासारखा ऐटीत बसला होता. त्याच्या दोन्ही बाजूंना पाच-पाच मुले-मुली बसल्या होत्या. ही सिनिअर विद्यार्थ्यांची कमिटी होती आणि चेंग तिचा अध्यक्ष होता.

हुशार मुले असली, तरी त्यांच्यात हूडपणा नसतो असे नाही. विशेषकरून शाळेमध्ये त्या हूडपणाला जास्तच जोर येतो. सिंगापूरच्या शाळेत हा हूडपणा मोठ्या स्वरूपात प्रकट व्हायचा. नवीन विद्यार्थ्यांची खोड काढण्याची तिथे प्रथाच होती. त्या प्रथेला भारदस्तपणा यावा, म्हणून खोड काढणाऱ्यांतर्फे एक समिती स्थापन करण्यात आली. तिच्यात बहुतेक दुसऱ्या वर्षातले विद्यार्थी असायचे. त्रास देण्याचे वेगवेगळे प्रकार ज्याच्या सुपीक डोक्यातून सर्वांत जास्त निघतील तो म्होरक्या बने. या नियमानुसार चेंग त्या कमिटीचा चेअरमन बनला होता.

चेंगच्या आज्ञेवरून दोघांनी जाऊन खोलीबाहेर धरून ठेवलेल्या नवीन विद्यार्थ्याला आत आणले.

''आलोक नाईक.''

चेंगने समोरच्या मुलाकडे पाहिले. अंगयष्टीने हाडकुळा; पण चेहऱ्यावर विलक्षण बुद्‌धिमत्तेचे तेज असलेला हा मुलगा पाहून चेंगला मनातून त्याच्याबद्‌दल सहानुभूती वाटली; पण ती दाबून तो करड्या स्वरात म्हणाला,

''मी हाक मारली, की उत्तर द्यायचं असा इथला रिवाज आहे.''

''आपला परिचय एकतर्फीच झाला. तो पूर्ण व्हायची मी वाट पाहत होतो,'' आलोक शांतपणे म्हणाला.

''आमची नावं तुला कळण्याची काही जरुरी नाही,'' चेंग गरजला.

''ठीक आहे. तुम्हांला जर नाव सांगायची लाज वाटत असली तर सांगू नका.''

आलोकच्या चेहऱ्यावर उपरोध दिसत होता. चेंग वरमला. नेहमी त्याच्यापुढे आणलेले नवीन विद्यार्थी आधीच गळून गेलेले असायचे. त्याला प्रत्युत्तर करणारा प्रथमच भेटत होता.

''मी हुआन चेंग, मी या कमिटीचा चेअरमन.'' त्याने इतरांची नावे सांगितली आणि पुढे म्हणाला, ''तुझ्यापुढं जे वाढून ठेवलंय ते अशा वेळकाढूपणानं फार वेळ पुढं ढकलता येणार नाही तुला!''

''माझ्यापुढं काय वाढून ठेवलंय ते अजून मला माहीत नाही. ते अप्रिय असेल तर पुढं ढकलण्याचा प्रश्न उद्भवतो; पण जोपर्यंत ते प्रिय आहे का अप्रिय आहे हेच मला माहीत नाही, तोपर्यंत मी वेळकाढूपणा करतोय, असं म्हणणं तर्कसंगत होणार नाही.''

आलोकशी वाद घालत बसलो तर आपला निभाव लागणार नाही हे चेंगला एव्हाना कळून चुकले होते. तो सरळ मुद्द्यावर आला.

''आम्ही प्रत्येक नव्या विद्यार्थ्याला तीन कामं करायला सांगतो. ती त्यानं नीट केली तर ठीक, नाही तर त्यानं आम्ही दिलेली शिक्षा भोगली पाहिजे. इथली प्रथाच आहे ही, तेव्हा उगीच 'का' म्हणून विचारू नकोस.''

''प्रथा आहे म्हटल्यावर 'का' म्हणून विचारायचं नसतं हे मला माहीत आहे; पण एक वेगळा प्रश्न विचारू?''

''विचार.'' ''तुम्ही ज्या गोष्टी मला करायला सांगणार आहात त्या 'शक्य' कोटीतल्या असतील अशी मी अपेक्षा करतो, कारण जर त्या 'अशक्य' म्हणून सिद्ध झालेल्या असल्या तर मला करायला सांगण्यात अर्थ नाही. तुम्ही मला केवळ बळजबरीनं शिक्षा करायला आणलंय असंच त्यातून दिसून येईल.''

चेंगच्या कमिटीचा दावा असे, की आम्ही निष्कारण शिक्षा करत नाही. त्यालाच उद्देशून आलोकचा हा प्रश्न होता. चेंगला पूर्वानुभवावरून माहीत होते, की तो जी कामे करायला सांगणार होता, ती शक्य कोटीतली असली, तरी इतकी अवघड असणार, की ती पाहून कुठलाही विद्यार्थी हादरून जाईल. त्याच्याकडे अशा कामांची मोठी यादी होती.

''यांतील कुठलंही काम अशक्य नाही याची मी ग्वाही देतो,'' तो साळसूदपणे म्हणाला. त्याने टाळी वाजवली आणि म्हणाला, ''पहिल्या कामाची तयारी करा.''

त्याच्या सहकाऱ्यांनी चार मीटर लांब व आठ मीटर रुंद असे एक जाजम त्या हॉलच्या फरशीवर पसरले. मग चेंग म्हणाला, ''मी जे काम सांगणार आहे ते तुला करायला हवे.''

आलोकने पाहिले, की बहुतेक समितीचे सभासद अंगापिंडाने वजनदार होते. तो म्हणाला, ''काम सांगा.''

''कुठलंही साधन न वापरता आणि त्या जाजमाच्या लाल पृष्ठभागाला स्पर्श न करता ते सफरचंद मला आणून दे.''

आलोकने पाहिले, की ते जाजम वरून लाल होते; पण त्याला आठवले की ते आणून पसरण्यापूर्वी त्याच्या उलट्या पृष्ठभागावर ते काळे होते. त्याने काळजीपूर्वक जाजमाच्या खाली बोटे सारली आणि त्याचे भेंडोळे करत मध्यभागापर्यंत आला आणि ते सफरचंद उचलून चेंगला दिले.

चेंगने इतर सभासदांकडे पाहिले. त्यांनी मानेने अनुमोदन दिले.

चेंग म्हणाला, ''आता दुसऱ्या कामाची साधनं आणा.''

एका सहकाऱ्याने एक कोट आणि जाकीट आणले. आलोकच्या अंगावर जाकीट आणि त्यावर कोट चढवला. त्याच्या हाडकुळ्या शरीरयष्टीवर दोन्ही वस्त्रे फार ढगळ ढगळ दिसत होती. चेंग म्हणाला, ''हे दुसरं काम असं आहे – अंगावरचा कोट न उतरवता जाकीट काढून दाखव.''

आलोकने पाहिले की कोट आणि जाकीट, दोन्हींना बटने नव्हती. त्याच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. तो म्हणाला, ''मी हे काम करून दाखवीन; पण त्यानंतर कोट आणि जाकीट यांना इस्त्री करायची जबाबदारी तुमची.'' त्याने कोटाच्या दोन्हीकडच्या बाजू जाकिटाच्या हातांच्या भोकांत खुपसल्या. त्यानंतर त्याने काय काय केले ते पाहणाऱ्यांनाही नीट सांगता आले नसते; पण मिनिटभरातच जाकीट त्याच्या हातात होते आणि कोट अंगावर. दोन्हीचा चांगलाच चुरगळा झाला होता.

चेंगचे सहकारी अस्वस्थ झाले होते.

चेंग आता तिसऱ्या कामाकडे वळला. ''हे तिसरं काम आता करायचे आहे.''

त्याने एक पोस्टकार्ड आलोककडे दिले आणि म्हणाला, ''त्या टेबलावर कात्री आहे. तिनं या पोस्टकार्डला असं भोक पाड, की त्यातून तुला उभ्या उभ्या जाता येईल.''

हे काम आजवर कुठल्याच विद्यार्थ्याने केले नव्हते. एवढ्याशा पोस्टकार्डामधून पाच फुटी मुलगा कसा जाऊ शकेल? पण आलोक किंचितही डगमगला नाही. त्याने ती बारीक कात्री घेऊन ते पोस्टकार्ड अशा खुबीने कातरले की त्याचे एका तंतूसारख्या नाजूक; पण आकाराने मोठ्या, बांगडीत रूपांतर झाले.

आलोक त्या बांगडीतून सहजपणे जाऊ शकला. कधी नव्हे ते त्या समितीच्या सभासदांनी स्वयंस्फूर्तपणे टाळ्या वाजवल्या.

आलोक त्या दिव्यातून पार पडणारा पहिलाच विद्यार्थी होता.

◆◆◆

## स्वाध्याय

**प्र.१. आकृती पूर्ण करा.**

कथेतील दोन मुख्य पात्र

| | |
|---|---|
| | |

**प्र.२. तुलना करा.**

| हुआन चेंग | आलोक |
|---|---|
| १) | |
| २) | |
| ३) | |
| ४) | |

**प्र.३. चौकट पूर्ण करा.**

सिंगापूरच्या शाळेतील प्रथा [ ]

**प्र.४. चेंग याने आलोकला करायला सांगितलेल्या तीन गोष्टी कोणत्या?**

**प्र.५. आलोकने कौशल्याने आणि बुद्धिमत्तेने केलेल्या कृती कोणत्या?**

**प्र. ६. स्वमत.**

(१) आलोकमधील तार्किक बुद्धी दिसणारा प्रसंग सांगा.

(२) हुशार मुलांमध्येही हूडपणा असतो, हे कथेच्या आधारे लिहा.

## भाषाभ्यास

### अनुस्वार लेखनाबाबतचे नियम

**✲ खालील शब्द वाचा.**

'रंग', 'पंकज', 'पंचमी', 'पंडित', 'अंबुज' हे शब्द तत्सम आहेत. हे आपण पर-सवर्णानेसुद्धा लिहू शकतो, म्हणजे अनुस्वारानंतर येणाऱ्या अक्षराच्या वर्गातील अनुनासिक वापरून लिहू शकतो. उदा., रङ्ग, पङ्कज, पञ्चमी, पण्डित, अम्बुज असे. विशेषत: जुने साहित्य वाचले तर असे लेखन दिसते; परंतु आजकाल अशी पर-सवर्णाने लिहिण्याची पद्धत जुनी झाली आहे. त्याऐवजी अनुस्वारच वापरले जातात. खालील शब्द बघा कसे दिसतात!

'निबन्ध', 'आम्बा', 'खन्त', 'सम्प', 'दङ्गा' हे शब्द बघायला विचित्र वाटतात ना! कारण हे तत्सम नाहीत. पर-सवर्ण लिहिण्याची पद्धत फक्त तत्सम शब्दांपुरती मर्यादित आहे. संस्कृत नसलेले मराठी शब्द शीर्षबिंदू देऊनच लिहावेत.

**मराठीत स्पष्टोच्चारित अनुनासिकांबद्दल शीर्षबिंदू द्यावा.**

**✲ खालील शब्द वाचा.**

'सिंह', 'संयम', 'मांस', 'संहार.' या शब्दांचा उच्चार खरे तर खूप वेगळा आहे ना? या शब्दांचे 'सिंव्ह', 'संय्यम', 'मांव्स', 'संव्हार' उच्चार असे होत असले तरी लिहिताना हे शब्द तसे लिहू नयेत.

**य्, र्, ल्, व्, श्, ष्, स्, ह् यांच्यापूर्वी येणाऱ्या अनुस्वारांबद्दल केवळ शीर्षबिंदू द्यावा.**

**पर-सवर्णाने लिहा.**

घंटा, मंदिर, चंपा, चंचल, मंगल

**अनुस्वार वापरून लिहा.**

जङ्गल, चेण्डू, सञ्च, गोन्धळ, बम्ब

# ♦ उपयोजित लेखन

## १. पत्रलेखन

आपल्या मनातील भावना, विचार, मते मुद्देसूदपणे, सुसंबद्ध पद्धतीने अपेक्षित व्यक्तीपर्यंत लिखित स्वरूपात पोहोचवण्याचे उत्तम माध्यम म्हणजे पत्रलेखन होय.

पत्रलेखन
- औपचारिक (व्यावहारिक)
- अनौपचारिक (घरगुती, कौटुंबिक)

यापूर्वीच्या इयत्तांमध्ये तुम्ही कौटुंबिक पत्रलेखनाचे काही नमुने अभ्यासले आहेत.

यावर्षी आपण औपचारिक पत्रप्रकारांचा अभ्यास करणार आहोत. १) मागणीपत्र २) स्वपरिचय पत्र

**औपचारिक पत्र म्हणजेच व्यावसायिक पत्र**

✻ मागणी, विनंती, तक्रार, अर्ज, अर्जासाठी स्वपरिचय या पत्रप्रकारांचा समावेश औपचारिक पत्रप्रकारांमध्ये होतो.

✻ औपचारिक पत्राची भाषा.

(१) शिष्टाचार सांभाळणारी असावी. (२) पत्राच्या विषयानुसार ज्यांना पत्र पाठवायचे आहे त्यांना उद्देशून व त्यांच्या योग्य सन्मानानुसार संबोधन असावे. (उदा., माननीय व्यवस्थापक)

**पत्रलेखनाचे महत्त्वाचे घटक**

| | | |
|---|---|---|
| पत्र कोणी लिहिले ? | पत्र पाठवणारा | प्रेषक |
| पत्र कोणाला लिहिले ? | ज्याला पत्र पाठवायचे | प्रति |
| पत्र कशासाठी लिहिले ? | पत्राचा विषय | विषय |
| पत्र केव्हा लिहिले ? | पत्र केव्हा पाठवायचे | दिनांक |
| पत्ता | पत्त्यासह लिफाफा | |

पत्रलेखन हा घटक कृतीच्या स्वरूपात विचारला जाईल.

**पत्रलेखनाचे स्वरूप**
- पत्रलेखनाचा विषय (निवेदन), सूचना, जाहिरात, बातमी इत्यादींपैकी एक.
- कृतीच्या आकलनावरून पत्रलेखन.
- कृतीतील सर्व मुद्दे लेखनात येणे आवश्यक.
- पत्राच्या विषयानुरूप प्रभावी भाषाशैली.

**औपचारिक पत्राची मांडणी**

१. पत्राच्या सुरुवातीला उजव्या कोपऱ्यात पत्र लिहिणाऱ्याचे नाव, हुद्दा, पिनकोडसह पत्ता, दिनांक, ई-पत्ताही असावा.
२. डावीकडे योग्य मायना लिहावा. संबंधित व्यक्तीचे नाव, हुद्दा, पत्ता लिहावा.
३. कृतीत विशेषनाम दिले असेल तरच ते लिहावे. अन्यथा प्रति, प्रेषक या ठिकाणी 'अ. ब. क.' असा उल्लेख करावा.
४. औपचारिक पत्रात पत्राचा 'विषय' लिहिणे आवश्यक आहे.
५. महोदय/महोदया असे लिहून पत्रलेखनास सुरुवात करावी.
६. विषयानुरूप लेखन व भाषा असावी.
७. शेवटी योग्य ते संबोधन वापरून समारोप करावा.
८. लिफाफ्यावरील सर्व नोंदी अचूक असाव्यात.

**लक्षात घ्या, औपचारिक पत्रलेखन ही एक कला आहे, तसेच ते शास्त्रही आहे.**

**स्वपरिचय पत्र म्हणजेच वैयक्तिक माहिती सादर करणारे पत्र**

आपल्याला कोणत्याही कारणाने (अर्ज करणे, विनंती करणे यासाठी) स्वतःची माहिती सादर करणे आवश्यक असते, तेव्हा या अनौपचारिक अर्ज/पत्रासोबत स्वपरिचय सादर करावे लागते. ते लिहिण्याचा ठरावीक नमुना असतो. तो लक्षात घ्या.

**टीप : स्वपरिचय पत्रातील सर्व माहिती विषयानुरूप परंतु काल्पनिक असावी.**

**स्वपरिचय पत्राचे मुद्दे**

(१) संपूर्ण नाव
(२) पत्ता
(३) संपर्क क्रमांक
(४) जन्मतारीख
(५) शैक्षणिक पात्रता/विशेष प्रशिक्षण
(६) छंद
(७) अनुभव/पारितोषिके
(८) इतर कलांमधील प्रावीण्य

**नमुना १**

**मागणीपत्र**

शाळा व विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी ! सुवर्णसंधी !!
साफल्य बुक डेपो, नाशिक, यांच्याकडून माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम
यांना आगळीवेगळी
आदरांजली
वाचन प्रेरणादिनानिमित्त कोणत्याही वाचनीय पुस्तकावर
५०% सवलत.

सवलत १५ ऑगस्ट ते १६ ऑक्टोबर
: स्थळ :
साफल्य बुक डेपो, मंगळवार पेठ, नाशिक

विद्यार्थी या नात्याने स्वतःसाठी तुमच्या आवडीच्या पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.

शालेय ग्रंथालय प्रमुख या नात्याने साफल्य बुक डेपोकडे पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.

**नमुना २**

- **खालील निवेदन वाचा–**

संबंधित विषयासाठी स्वपरिचय पत्र तयार करा.

**सूचना फलक**


**विकास विद्यालय, नंदुरबार**
**५ सप्टेंबर शिक्षकदिन**
‘विद्यार्थी शिक्षकदिनाचे आयोजन’
‘विद्यार्थी शिक्षक’ होण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांकडून
स्वपरिचयपत्र मागविण्यात येत आहे.

स्वपरिचयपत्र – २ सप्टेंबरपर्यंत वर्गशिक्षकांकडे द्यावीत.

# २. गद्य आकलन

प्रश्नांची रचना तयार करता येणे, हे महत्त्वाचे भाषिक कौशल्य आहे. हे कौशल्य प्राप्त होण्यासाठी 'गद्य आकलन' या घटकाचा समावेश अभ्यासक्रमात करण्यात आला आहे.

दिलेला उतारा वाचून त्यावर आधारित पाच प्रश्न तुम्हांला तयार करायचे आहेत. हे पाच प्रश्न असे असावेत, की त्यांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात येतील.




१. तयार केलेला प्रश्न अर्थपूर्ण असावा.
२. कोण ? कोठे ? केव्हा ? का ? इत्यादी प्रकारच्या प्रश्नांची रचना करण्याचा सराव करावा.
३. प्रश्नाचे उत्तर उताऱ्यातच असेल असेच प्रश्न असावेत.
४. उत्तरे पडताळून पाहावीत.
५. उत्तरे लिहिण्याची आवश्यकता नाही.
६. प्रश्नाच्या शेवटी प्रश्नचिन्ह देणे आवश्यक आहे.
७. उताऱ्याला 'योग्य शीर्षक कोणते असेल' असा प्रश्न तयार करू नये.

### नमुना गद्य आकलन उतारा

**⁂ खालील उतारा वाचा व त्याच्या आशयावर प्रश्न तयार करा.**

रोजचा दिवस आपल्यापुढे नवीन आव्हाने घेऊन येतो . ती आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य अंगी बाणायचे असेल तर स्वतःला घडवले पाहिजे. स्वतःला घडवायचे ते कशासाठी, तर जीवनात यशस्वी होण्यासाठी. यश म्हणजे नेमके काय ? आपण जे उद्दिष्ट ठरवलेले असते, ते प्राप्त करणे म्हणजे यश. आपल्या प्रत्येकाच्या अंगी काही कौशल्ये असतात, गुणवत्ता असते. त्या कौशल्याची, गुणवत्तेची सर्वोत्तम पातळी गाठणे म्हणजेच यश.

यश मिळवणे जितके महत्त्वाचे असते, त्यापेक्षा मिळवलेले यश टिकवणे अधिक महत्त्वाचे असते. स्वकष्टाने निर्माण केलेले स्थान टिकवण्यासाठी आपल्याला रोज नवे नवे शिकावे लागते. हे शिकत असताना चुका होणे काहीच गैर नाही ; पण एकदा केलेली चूक पुन्हा पुन्हा करणे मात्र आपल्या प्रगतीतील धोंड आहे. तुमची खरी स्पर्धा इतरांशी नसते. ती स्वतःशीच असते. इतरांशी तुलना जरूर करावी ; पण ती स्वतःची क्षमता वाढवण्यासाठी, दुसऱ्याला कमी लेखण्यासाठी नव्हे.

**गद्य आकलन उतारा प्रश्न**

१. नवी आव्हाने पेलण्यासाठी काय करावे ?
२. यश म्हणजे नेमके काय ?
३. गुणवत्तेची सर्वोत्तम पातळी गाठणे म्हणजे काय ?
४. यशप्राप्तीपेक्षाही अधिक महत्त्वाचे काय असते ?
५. आपल्या प्रगतीतील अडचण (धोंड) कोणती ?

वरील प्रश्न 'नमुना' म्हणून आहेत. तुम्ही यापेक्षा वेगळे प्रश्न तयार करू शकता.


# ३. कथालेखन

उपयोजित लेखनप्रकारांमध्ये 'कथालेखन' हा घटक विद्यार्थ्यांच्या सृजनशील लेखनाला वाव देणारा आहे. कल्पना, नवनिर्मिती, स्वभाषेत प्रकटीकरण हे या वयोगटाचे वैशिष्ट्यपूर्ण पैलू आहेत. कथालेखनाच्या योग्य सरावाने भावी कथालेखक घडू शकतील.

कथाविषयांनुसार कथांचे विविध प्रकार पडतात.

उदा.,

(१) शौर्यकथा (२) विज्ञान कथा (३) बोधकथा (४) ऐतिहासिक कथा (५) रूपककथा (६) विनोदी कथा इत्यादी.कथालेखनाचे महत्त्वाचे घटक जाणून घेण्यासाठी खालील मुद्द्यांचा अभ्यास करून कथालेखन तंत्र जाणून घेऊया.




**खालील मुद्द्यांचा सविस्तर विचार करूया.**

**(१) कथाबीज–**

कथालेखन ही कल्पकतेवर आधारलेली कला आहे. कथाबीज हा कथेचा प्राण असतो. कथालेखन करताना कथाबीजाच्या विषयास अनुसरून दैनंदिन निरीक्षण, वाचन, अनुभव, सृजनशील कल्पना, भावना यांचा विचार करून कथाबीज फुलवावे.

**(२) कथेची रचना–**

कथेला प्रारंभ, मध्य व शेवट असावा. कथेची सुरुवात आकर्षक असावी. वाक्यांची रचना पाल्हाळिक नसावी. अर्थपूर्ण छोटी छोटी वाक्ये असावीत. कथेचा मजकूर सातत्याने उत्कंठावर्धक असावा. कथेतील आशयाला काहीतरी वळण असेल, तर उत्कंठा अधिक वाढते. कथा नेहमी भूतकाळातच लिहावी.

**(३) कथेतील घटना व पात्रे–**

कथाबीजानुसार कथेतील पात्रे व घटना निवडाव्यात, त्या कथाबीजाला पुढे नेऊ शकतील. घटना घडण्याचे स्थळ सुसंगत निवडावे. पात्र, घटना व स्थळांच्या वैशिष्ट्यांचे बारकावे जाणून घेऊन वर्णन करावे. वर्णन चित्रदर्शी असावे.

**(४) पात्रांचे स्वभाव विशेष–**

कथेतील आशयाला समर्पक असे पात्रांच्या स्वभाव विशेषांचे व त्यानुसार असलेल्या वर्तनांचे वर्णन करावे.
उदा., राग आला तर– त्याने हाताच्या मुठी करकचून आवळल्या इत्यादी.

**(५) कथेतील संवाद व भाषा–**

कथेत निवडलेल्या परिसराला, कथाबीजाला अनुसरून कथेची भाषा असावी. आलंकारिक भाषेचा वापर करून कथेची परिणामकारकता वाढवता येते. विरामचिन्हांचा योग्य वापर करावा. संवादाची परिणामकारकता विरामचिन्हांमुळे निर्माण होते. पात्रांच्या तोंडी पात्राच्या वैशिष्ट्यांच्या गरजेनुसार ग्रामीण भाषा व बोलीभाषा यांचा वापर सहजतेने करायला हवा. कथेमध्ये वाक्प्रचार, म्हणी यांचा सुयोग्य वापर करावा.

**(६) शीर्षक, तात्पर्य–**

संपूर्ण कथेचा आशय, कथेतील मूल्य/संदेश व्यक्त करणारे शीर्षक असावे. कथेतून मिळणारा संदेश/मूल्य किंवा कथेतील वैशिष्ट्यपूर्ण आशय प्रतिबिंबित करणारे तात्पर्य असावे.

**कथालेखन पूर्णत: सृजनशील कल्पकतेवर अपेक्षित आहे. कथाबीज विस्तारासाठी, अपूर्ण कथा पूर्ण करण्यासाठी वेगळा नावीन्यपूर्ण विचार किंवा कल्पना अपेक्षित आहे.**

**विद्यार्थ्यांनो, तुमच्या सृजनशील कल्पनेला खूप धुमारे फुटू शकतात. त्यांना फक्त निरीक्षण व कल्पकतेने अभिव्यक्त करा.**

**कथालेखन मूल्यमापनाच्या नियोजित कृती**

(१) कथाविषयांवरून कथालेखन
(२) मुद्द्यांवरून कथालेखन
(३) दिलेल्या शब्दांवरून कथालेखन
(४) कथेचा पूर्वार्ध देऊन उत्तरार्ध लिहिणे किंवा उत्तरार्ध देऊन पूर्वार्ध लिहिणे.

कथालेखनासाठी वरीलपेक्षा वेगळ्या, सृजनशील पद्धतीने कृतींची मांडणी केली जाऊ शकते. अशा वैविध्यपूर्ण कृतींचा शोध घ्यावा व त्यांचा अभ्यास करावा.

## कथालेखन नमुना

- **खालील अपूर्ण कथा वाचा. तुमच्या विचाराने व कल्पनेने कथा पूर्ण करा.**

आज शाळेमध्ये खो खोच्या संघाचे आंतरशालेय सामने सुरू होणार होते. सकाळी ७ वाजताच शाळेचा सर्व संघ मैदानावर हजर होता. सर्वांच्याच मनात उत्सुकता, उत्साह, चैतन्य संचारले होते. सलीम आमच्या संघाचा कर्णधार मात्र अजून यायचा होता. आम्ही सर्वजण त्याची आतुरतेने वाट पाहत होतो. सलीम अजून का येत नाही म्हणून चिंतीतही होतो.

पंचांनी दोन्ही संघांना मैदानात पाचारण केले. संघात कुजबुज सुरू झाली आणि तेवढ्यात धापा टाकत सलीम मैदानावर आला आणि.....

- **तुम्ही लिहिलेल्या कथेला योग्य शीर्षक द्या व कथेचे तात्पर्य लिहा.**
- **तुम्ही कथा तयार करताना व लिहिताना कोणकोणत्या गोष्टी विचारात घेतल्या याची यादी करा.**

# ४. वृत्तान्त लेखन

वृत्तान्त लेखन

घडलेल्या घटनेचे नेमके वर्णन

* वृत्तान्त लेखनात राग, आनंद, दु:ख, आश्चर्य इत्यादी तीव्र भावना व्यक्त करणे अपेक्षित नाही.

लक्षात ठेवा

- कल्पनेला अजिबात वाव नाही
- सत्यकथन व वस्तुनिष्ठता यांस महत्त्व

* सभा, संमेलने, शिबिरे, कार्यशाळा यांच्याविषयी एखाद्या घटनेसंबंधी सविस्तर व क्रमवार माहिती सांगणे म्हणजे वृत्तान्त लेखन होय.

वृत्तान्त लेखन

- आटोपशीर व आकर्षक पद्धतीने लेखन आवश्यक
- दिनांक, वेळ, ठिकाण देणे आवश्यक

**लक्ष द्या.**

वृत्तान्त

- घटनेचे नेमके वर्णन
- स्थळ, काळ, व्यक्ती यांचा अचूक उल्लेख
- लहान वाक्ये व लहान परिच्छेद
- घटनांचा योग्य क्रम
- स्पष्टीकरण
- मथळा

- **खालील विषयावर वृत्तान्त लेखन करा.**

**नवमहाराष्ट्र विद्यालय**

विमाननगर, वसई.

**जागतिक विज्ञानदिन सोहळा**

जागतिक विज्ञानदिनानिमित्त सुप्रसिद्ध खगोल शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांचे व्याख्यान

प्रमुख उपस्थिती– .........

२८ फेब्रुवारी

**वेळ**

सकाळी ११ वाजता

**स्थळ–**

डॉ. होमी भाभा सभागृह

## वृत्तान्त लेखन नमुना

### वाचन प्रेरणादिन संपन्न

**१६ ऑक्टोबर, पारनेर, जि. नगर :** प्रेरणा विद्यालयात वाचन प्रेरणा दिनानिमित्त '३ तास वाचनाचे' कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध लेखक श्री. द.मा. मिरासदार उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री.द.मा. मिरासदार यांनी आपल्या विनोदी, खुमासदार शैलीत वाचनाचे महत्त्व सांगितले.

इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या पुस्तकांचे सलग ३ तास वाचन केले. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावण्यास हा कार्यक्रम नक्कीच उपयुक्त ठरेल. कार्यक्रमाचे शेवटी शाळेच्या मुख्याध्यापकांनी मुलांचे कौतुक केले. पुस्तके उपलब्ध करून देण्यात मोठा वाटा असणारे शिक्षक व ग्रंथपाल यांचे आभार मानले. विद्यार्थ्यांनीही वाचनाचा पुरेपूर आनंद घेतला.

- वरील वृत्तान्त वाचा व त्यासाठीची कृती तयार करा.

# ५. लेखनकौशल्य

## निबंध लेखन

निबंधलेखन म्हणजे विषयानुरूप केलेली विचारांची मुद्‌देसूद मांडणी होय. एखाद्या विषयाच्या अनुषंगाने आपल्या मनात येणारे विचार, भावना, कल्पना, स्वानुभव यांना प्रभावी भाषेत मुद्‌देसूदपणे मांडणे म्हणजे निबंधलेखन. निबंधलेखनात लिहिणाऱ्याच्या विचारांचे प्रतिबिंब पडत असते. लेखनकौशल्याचा विकास व अभिव्यक्ती क्षमतेचा विकास हे निबंधलेखन घटकाचे प्रमुख उद्‌दिष्ट आहे.

**निबंधलेखनासाठी आवश्यक गोष्टी.**

- निरीक्षण
- वाचन
- बहुश्रुतता
- शब्दसंपत्ती
- चिकित्सक विचार
- कल्पना
- भावना
- अनुभव
- चिंतन
- विषयानुरूप भाषा

पाठ्यपुस्तकातील निबंधलेखन-लेखनकौशल्यांतर्गत आपण इयत्ता नववीसाठी वर्णनात्मक व आत्मकथन या निबंधप्रकारांचा अभ्यास करूया.

कल्पकता, तर्कसंगती, विचारांची सुसंगत व सुसंबद्‌ध मांडणी ही लेखनकलेची काही वैशिष्ट्ये आहेत. आपण निबंध लिहितो म्हणजे विषयाच्या अनुषंगाने असलेले आपले वाचन, चिंतन, निरीक्षण, विचार व भावना यांना शब्दबद्‌ध करतो. आपले अनुभव मुद्‌देसूदपणे मांडतो. त्यासाठी प्रत्येक अनुभवाकडे संवेदनशीलतेने पाहता यायला हवे. आपल्या शब्दांतील अनुभव इतरांच्या मनाला भिडेल असा मांडता यायला हवा. शब्दांतून भाषासौंदर्य व्यक्त व्हायला हवे.

वाचन, आकलन, निरीक्षण, विचार, भावना, कल्पना व अनुभव यांची प्रभावी शब्दांत अभिव्यक्ती हा लेखनकौशल्य विकासाचा गाभा आहे.

निबंधलेखनासाठी आवश्यक क्षमता, कौशल्ये, अभ्यास घटक हे सर्वच निबंध प्रकाराबाबत समान असले तरी प्रत्येक निबंध प्रकाराचे स्वत:चे वेगळेपण असते. निबंध प्रकार हाताळताना ती वैशिष्ट्ये लक्षात घेणे, ती अभ्यासणे, सुयोग्य उपयोग करणे आवश्यक ठरते.

### (१) वर्णनात्मक -

एखादी घटना, प्रसंग पाहिल्यावर, अनुभवल्यावर किंवा कल्पनेने त्याचे नेमके वर्णन प्रभावी शब्दांत करणे हे वर्णनात्मक निबंधात अपेक्षित असते. वर्णनात्मक निबंधासाठी व्यक्तीचे आवडते स्थळ, पशुपक्षी किंवा घडलेली घटना, प्रसंग, निसर्ग इत्यादी विविध प्रकारचे विषय असू शकतात.

वर्णन करताना सर्वांत महत्त्वाचे असते ते सूक्ष्म निरीक्षण. अवांतर वाचनाने मिळवलेली माहिती, आपले विचार, भावना, संवेदनशीलता यांची जोड देऊन ते निबंधाच्या विषयानुरूप मुद्‌देसूदपणे मांडणे हे महत्वाचे असते.


वर्णनात्मक निबंधात वर्णन अगदी हुबेहूब, निबंधविषयाचे शब्दचित्र डोळ्यांसमोर उभे राहील असे होणे, हे निबंधलेखनाचे महत्त्वाचे अंग आहे.

निबंधलेखन करताना लक्षात घ्यायचे मुद्‌दे -

(१) आकर्षक सुरुवात
(२) विषयानुरूप भाषा व मजकूर
(३) भाषाशैली
(४) सुयोग्य समारोप/शेवट

**किती लिहिले यापेक्षा कसे लिहिले, काय विचार केला, विषयाची मांडणी कशी केली, हे अधिक महत्त्वाचे आहेत.**

## नमुना-कृती




## (२) आत्मकथन-

**आत्मलेखन करताना लक्षात घ्यायचे मुद्दे :**

(१) सजीव आणि निर्जीव घटकांबाबत सर्वसमावेशक विचार.

(२) त्यांच्या भावना, सुखदु:ख, सवयी, उपयोगिता, कार्य यांचा शोध निरीक्षणशक्तीने घेणे.

(३) आपण स्वत: ती वस्तू आहोत अशी कल्पना करून. (परकाया प्रवेश)

(४) कल्पनाशक्तीच्या माध्यमातून नाट्यपूर्ण रीतीने कल्पना मांडणे.

(५) संपूर्ण लेखन करताना भाषा प्रथमपुरुषी एकवचनी असावी.

### आत्मकथन नमुना




वरील घटक (फूल) तुमच्याशी बोलत आहे, अशी कल्पना करून त्या घटकाचे (फुलाचे) आत्मवृत्त लिहा.



## पूरक पुस्तके व संदर्भग्रंथ यांची यादी

(१) हाती ज्यांच्या शून्य होते- संपादन अरुण शेवते.
(२) मुसाफिर- अच्युत गोडबोले
(३) एक होता कार्व्हर- वीणा गवाणकर
(४) मन में है विश्वास- विश्वास नांगरे पाटील
(५) आय डेअर- किरण बेदी
(६) आकाशाशी जडले नाते- जयंत नारळीकर
(७) समिधा- साधनाताई आमटे
(८) खरेखुरे आयडॉल- सुधा मूर्ती
(९) संस्कृतीच्या पाऊलखुणा- द. ता. भोसले
(१०) व्यक्ती आणि वल्ली- पु. ल. देशपांडे
(११) झाडाझडती- विश्वास पाटील
(१२) स्वामी- रणजित देसाई
(१३) सुगम मराठी व्याकरण व लेखन - मो. रा. वाळंबे



## महत्त्वाची संकेतस्थळे व लिंक्सची यादी

https://en.wikipedia.org/wiki/Shanta_Shelke
https://en.wikipedia.org/wiki/Vishnu_Sakharam_Khandekar
https://www.holidify.com/places/ajanta-and-ellora-caves/
https://www.youtube.com/watch?v=XP778mfukXA
https://en.wikipedia.org/wiki/Kabir
https://en.wikipedia.org/wiki/Kishori_Amonkar
https://en.wikipedia.org/wiki/Lezim
https://www.youtube.com/watch?v=AmlDuRlRe1Y
https://en.wikipedia.org/wiki/Zakir_Hussain_(musician)
https://en.wikipedia.org/wiki/Jayant_Narlikar

शिक्षकांनी वर दिलेली पूरक पुस्तके, संदर्भग्रंथ, संकेतस्थळे व लिंक्स यांचा वापर करून पाठ्यघटकांशी संबंधित अधिक माहिती मिळवावी. त्या माहितीचा अध्यापनात संदर्भ म्हणून उपयोग करावा.

# इयत्ता १ ली ते १२ वी ई-लर्निंग साहित्य

## मराठी, इंग्रजी माध्यमांमध्ये उपलब्ध

**ebalbharati**

वैशिष्ट्ये

- विषय योजनेनुसार निर्धारित करण्यात आलेल्या विषयांचा समावेश.
- पाठ्यपुस्तकावर आधारित परिपूर्ण ई-लर्निंग साहित्य.
- दृक-श्राव्य स्वरूपात.
- पाठनिहाय आशयाचे सादरीकरण व आवश्यकतेनुसार प्रश्नांचा समावेश.
- विविध कृती, चित्रे, आकृत्या इत्यादींचा समावेश.
- सहज व सोप्या अध्ययनासाठी ॲनिमेशनचा वापर.
- स्वाध्यायांचा समावेश.

पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारती मार्फत इयत्ता १ ली ते १२ वी च्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंग साहित्य (Audio-Visual) उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ई-लर्निंग साहित्य घेण्यासाठी....

- वरील Q.R.Code स्कॅन करून ई-लर्निंग साहित्य मागणीसाठी नोंदणी करा.
- Google play store वरून ebalbharati app डाऊनलोड करून ई लर्निंग साहित्यासाठी मागणी नोंदवा.
- पाठ्यपुस्तक मंडळाच्या www.ebalbharati.in, www.balbharati.in या संकेतस्थळांवर भेट द्या.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

मराठी आंतरभारती इयत्ता ९ वी

₹ ३८.००

